म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लय क्रमांक

लेखक

सन

पुस्तकाचें नांव



# रामजोशीकृत लावण्या.

हें पुस्तक,

सुशील यमुना, जयदेवी नाटक, स्त्रीगीतरत्नमाला
इत्यादि पुस्तकांच्या कर्त्यांनीं मोठ्या प्रयत्नानें
जोशीबोवांचा प्राचीन संग्रह मिळवून, त्यां-
तून अप्रसिद्ध अशा कविता निवडून
तपासून तयार केलें

तें,

## हक्कासहित आपलेकडे घेऊन,

## रावजी श्रीधर गोंधळेकर

यांनीं,

आपल्या "जगद्धितेच्छु" छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केलें.

पुणें:

ता० १ माहे आगष्ट सन १८८९ इसवी.

(हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें
रजिस्टर केलें आहे.)

सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनीं आपणाकडे ठेविले आहेत.

किंमत ६ आणे; ट० हं० १ आणा.

[illegible] ३१६

# प्रस्तावना.

प्रसिद्ध कवि सोलापुरकर **रामजोशी** ह्यांसंबंधानें आतां नव्यानें कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. अप्रतिम गुणानें त्यांचें नांव लोकविश्रुत झालें आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या कवितेसंबंधानें विशेष कांहीं सांगण्याची आवश्यकता नाहीं. कारण, त्यांची रसाळ व चटकदार कविता वाचून ज्याला आनंद झाला नाहीं असा मनुष्य विरळा.

आह्मास येथें लिहावयाचें ह्मणून इतकेंच कीं, आजपर्यंत रामजोशी बोवांच्या लावण्यांचीं जीं दोन तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांहून या आमच्या लावण्या निराळ्या आहेत. आजपर्यंत प्रसिद्धीस आल्या नाहींत अशा लावण्या निवडून, शुद्ध करून व प्रत्येक लावणींत काय सांगितलें आहे याविषयीं थोडक्यांत त्याच लावणीचे मथळ्यावर दिग्दर्शन करून, या पुस्तकांत घालण्याची योजना केली आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

या पुस्तकांतील शेवटच्या चार पांच लावण्यांत **धोंडी शाहिरचें** नांव घालण्यांत आलें आहे; यावरून शाहिरानेंच त्या लावण्या केल्या असाव्यात अशी

ग्रं. क्रमांक ३९६

# प्रस्तावना.

प्रसिद्ध कवि सोलापुरकर रामजोशी ह्यांसंबंधानें आतां नव्यानें कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. अप्रतिम गुणानें त्यांचें नांव लोकविश्रुत झालें आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या कवितेसंबंधानें विशेष कांहीं सांगण्याची आवश्यकता नाहीं. कारण, त्यांची रसाळ व चटकदार कविता वाचून ज्याला आनंद झाला नाहीं असा मनुष्य विरळा.

आह्मास येथें लिहावयाचें ह्मणून इतकेंच कीं, आजपर्यंत रामजोशी बोवांच्या लावण्यांचीं जीं दोन तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांहून या आमच्या लावण्या निराळ्या आहेत. आजपर्यंत प्रसिद्धीस आल्या नाहींत अशा लावण्या निवडून, शुद्ध करून व प्रत्येक लावणींत काय सांगितलें आहे याविषयीं थोडक्यांत त्याच लावणीचे मथळ्यावर दिग्दर्शन करून, या पुस्तकांत घालण्याची योजना केली आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

या पुस्तकांतील शेवटच्या चार पांच लावण्यांत धोंडी शाहिरचें नांव घालण्यांत आलें आहे; यावरून शाहिरानेंच त्या लावण्या केल्या असाव्यात अशी

वाचकांची कल्पना होणार आहे; परंतु वास्तविक प्रकार तसा नाहीं. धोंडी शाहिराचें नांव घातलें आहे तरी त्या लावण्या जोशीबोवांच्याच आहेत हें खालील आख्यायिकेवरून कळून येईल.

सोलापुरांत रामजोशीबोवांचे घरासमोर एक धोंडी शाहिर नांवाचे गृहस्थ रहात होते. त्यांचे घरीं जोशीबोवाचें जाणें येणें व बैठक असे. जोशीबोवांचे वडील व मातोश्री लहानपणींच निवर्तली होतीं; तेव्हां वडील बंधूचे पंक्तीस नित्य दोनही वेळ जेवून जोशीबोवानीं शाहीरचे घरीं रात्रंदिवस बैठक ठेविली होती. शाहीरचे घरीं रोज रात्रीं मंडळी जमून लावण्या ह्मणत असत. त्यांबरोबर जोशीबोवांसही लावण्यांचा छंद अतिशय लागला. असें होतां होतां जोशीबोवांस स्वतः लावणी करण्याचा नाद लागला. आणि ते नित्य एक लावणी नवी करून शाहीर याचे घरीं रात्रीं मंडळीमध्यें ह्मणून दाखवूं लागले. प्रथमतः त्यांणीं शृंगारपर लावण्या करण्यास आरंभ केला, व लावणीचे शेवटीं ते आपल्या मित्राचें ह्मणजे धोंडीशाहिरचें नांव घालूं लागले. पुढें कांहीं दिवसांनीं शाहीर यांच्या लक्षांत ही गोष्ट येऊन त्यांनीं लावणींत आपलें नांव घालण्याचें जोशीबोवांकडून मना करविलें. शाहीर यांणीं जोशीबोवांस सांगितलें कीं, खरोखर मला कविता करण्याचें ज्ञान नसून, मोठे-

पणा देतां हें बरोबर नाहीं " असें सांगून तो प्रघात बंद करविला. यावरून शाहीर हा मनुष्य सत्यास मान देणारा होता असें दिसतें.

पुढें जोशीबोवा आपल्या कुलस्वामीचें ह्मणजे व्यंकटेशाचें नांव लावणींत घालूं लागले; तेव्हां कोणी शहाण्यानें सांगितलें कीं, 'असें करितां त्यापेक्षां तुह्मी आपलेंच नांव लावणींत कां घालीत नाहीं ? देवाचें नांव लावणींत घालण्यांत काय मोठेपणा आहे !' हें ऐकून जोशीबोवा पुढें आपलें नांव 'राम' असें लावणींत घालूं लागले. परंतु त्या कारणानें तर फारच घोंटाळा होऊं लागला. ह्मणजे त्याच वेळीं कोणी **रामा रंगारी** ह्मणून होता तोही लावण्या करून आपलें नांव 'राम' असें लावणींत घालीत असे. तेव्हां रामजोशी यांची लावणी कोणती आणि रामा रंगाऱ्याची कोणती, हें साधारण मनुष्यास ओळखण्याची मोठी अडचण पडूं लागली. हें वर्तमान जोशीबोवांच्या कानावर आलें तेव्हांपासून मग ते ' कविराय ' असें आपलें नांव लावणींतून घालूं लागले. पुढें मग हाच प्रघात शेवटपर्यंत कायम होता.

असो, हें लहानसें सुंदर पुस्तक रसिक जनांच्या आश्रयास पात्र झालें, तर पुस्तककर्त्यास अशा का-

मांत श्रम करण्याविषयीं मोठी उमेद राहणार आहे इतकें सांगून हा प्रस्तावनेचा लेख पूर्ण करतों.

ता० १ आगष्ट सन १८८९ इसवी. पंडित.

सं. ग्रंथ. ३२६

# रामजोशी लावण्या.

## भाग २ रा.

### लावणी १.

### रासरंगाची.

कुंजवनांत संपूर्ण गोपींसह कृष्ण रासरंग खेळूं लागले असतां एका गोपीस चुकून त्या खेळांत बोलाविली नाहीं. तेव्हां ती रुसून दूर उभी राहिली. परंतु तिचें चंचल मन दुसऱ्यांची होत असलेली क्रीडा समक्ष पाहून राहिना; तळमळ करूं लागलें. त्यावेळच्या स्थितीचे त्या गोपीचे उद्गार रामजोशी बोवांनीं खालील कवितेंत फार बहारीनें वर्णिले आहेत. यांत प्रास साधर्म्यांची खुबी फार आहे.

मज वाटे हरिसी आज होरि बाइ खेळावी॥का-
य करुगे रंगामध्यें तनुहि घोळावी ॥ धृ० ॥
बारा घरच्या रांडा बारा ॥ न पडों देति मा-
झा वारा ॥ नेला बहार त्यांनीं सारा ॥ मी
आहे कुळवंताचि दारा ॥ मानधारि ह्मणुन का-
य प्रभूनें वगळावी ॥ धृ० ॥ १ ॥ सांगुन धाडिन
प्रभुला बाई ॥ परि त्या बोलूं देतील काई ॥ झा-
ली माझ्या मनाला घाई ॥ त्यातर साऱ्या रत-
ल्या पाई ॥ दैव जिचें उघडलें तिला प्रभू बो-
लावी ! ॥ धृ० ॥ २ ॥ चाल जाऊं दुरुनि पा-
हूं ॥ कोठें आडून उभ्यानें राहूं ॥ हें दुःखक-
से मी साहूं ? ॥ विष खाऊन मरून तरि जाऊं॥
रंग नको कविराय ह्मणे करें ही घोळावी ॥ ३॥

## लावणी २.

### कौसल्येची गर्भस्थिति.

श्रीराम उदरीं आले असतां कौसल्येची स्थिति फार आश्चर्यकारक झाली. आणि पुढें नववा महिना पूर्ण होण्याच्या संधीस तर कौसल्या कांहीं विलक्षण व अमानुष चाळे करूं लागली. तेव्हां दशरथ घाबरून त्याणें कुलगुरु वसिष्ठास बोलावून आणून विचारलें. त्याकाळीं वशिष्ट कौसल्येची स्थिती आणि दशरथाचें भाग्य वर्णन करून त्यांचें त्यासच ह्मणजे दशरथ राजासच सांगूं लागले. तो प्रकार खालीं कवितेंत मोठा मजेदार कवीराजांनीं वर्णन केला आहे.

वसिष्ठ मुनिवर ह्मणे नृपाळा काय सांगु मी तरी ॥ पातला हरि कौसल्योदरी! ॥ धृ० ॥ भाग्य उदेलें तुझें सुकृतवान् धन्य वंश हा तुझा ! जगाचा तुजहुनि झाला खुजा ॥ अनंत जन्मीं परमात्म्याची तुलाच घडली पुजा ॥ पातला ब्रह्म तुझ्या हितगुजा ॥ बा दैवाचा तुला म्हणावें असा न कोणी दुजा ॥ पाहिला म्यां तुझ्या आजाचा आजा ! ॥ बा ब्रह्म आहे हें कौसल्येच्या कुशीं ॥ बा तेज फाकलें अद्भुत हें तिजपशीं ॥ तूं बावन कशिला काय लावशिल कशी ॥ मज जन्म वाटतो सत्यचि नवमी दिशीं ॥ गर्भ जाहला पूर्ण पातला रवि माध्यान्हावरी ॥ समय हा गुलाल घ्यावा करीं ॥ धृ० ॥ १ ॥

## लावणी ३.

### बारसी.

पुण्याहून पंढरपुराला जातांना रेल्वे सडकेच्या ज्या स्टेशनावर आपण उतरतों, तेंच बारसीला जाण्याचें स्टेशन होय. तेथून बा-

रसीला जाण्यास पक्की पायमार्गाची सडक आहे. सोलापूर जिल्ह्यांत बारसी गांव व्यापार संबंधानें मोठा प्रसिद्ध असून हा गांव फार प्राचीन वसलेला आहे. आणि वस्ती, रचना व बाजार चांगला पाहण्यासारखा आहे. येथेंच आमच्या कविरायानें वर्णन केलेलें प्राचीन श्रीभगवंताचें स्थान आहे. स्थान फारच मनोरम असून मूर्ति अत्यंत दर्शनीय आहे. खालील कवितेंत जोशीबोवानीं याच स्थळाविषयीं मजेदार वर्णिलें आहे.

दाट साधुचा हाट भागवत पाट रुचिर फारसी ॥ अशि हें अद्भुत जागें बारसी ॥ धृ० ॥ संत शांत गुणवंत पहा भगवंत नांदतो हरी ॥ मिरासी जागा याची खरी ॥ खुंटविली वैकुंठपेठ ही कंठितसे भूवरी । बारसी वतन याची खरी ॥ चार दिवस बाजार तिर्थीचा वार करुनि लौकरी । आला हो बाइल पाठीवरी ॥ मला वाटतें भला थेट हा आला पळुनिया घरीं । ओढितिल तेथें देणकरी ॥ चाल ॥ हा जरा बाजरा घेउनि आला गडी। नाहीं सूप टोपली वैकुंठीं तागडी ॥ श्री लपवुनि मागें पांघरतो घोंगडी ॥ जणुं वसन मिळेना कुसुमाची आंगडी ॥ रंगबाजहा बघा देतसे दगा मिसल सारसी ॥ आम्हाला पाहुनि बिनवारसी दाट साधुचा ॥ धृ० ॥ ॥ १ ॥ तिर्थे बुडविलें इथें आला हा, जिथ तिथें हा असा ॥ पहाहो खटला केला कसा ॥ सर्वांतित दुर्वास गर्विल गर्वा देउनि पिसा ॥ अंबरिषा दिला भरवसा ॥ तीर्थपारणार्थ मिषेंहो व्यर्थ गांजि राजसा ॥ मुनीचे पाठीं सुदर्शन ठसा ॥ शाप देउनी ताप सोशिले आपण गर्भी श

सा ॥ दाहादां काय चांगलें दिसा ॥ चाल ॥ हें क्षेत्र बारशी त्या दिवसापासुनी ॥ काय केलें यानें पंकनाम नासुनी ॥ जे मना येइल तें हा करतो हांमुनी ॥ इथें काय चालतें उदंड मुख वासुनी ॥ राय सुरांचा काय न करिहा पाय मात्र सारसी ॥ आम्हा भ्रमरासि गम्य फारसी ॥ धृ० ॥ २ ॥ वळखलिंगहा जंगम यानें संगम मुखि लाविला ॥ तयाचा सेवक हा ह्मणविला ॥ भक्ति योग सुविरक्ति जयाला मुक्ति मार्ग दाविला ॥ उत्तरेश्वरि मठ बांधुनि दिला ॥ गुरुवर्णाच्या मर्यादेनें निर्याणि स्थापिला ॥ मठावरि पुत्र योग्य जाहला ॥ नाम जया जयराम सुखाचें धाम रसिक साधुळा ॥ करुनि हा मगवंतीं ठेविला ॥ चाल ॥ या पुरुषवरानें अमर सभा जिंकिली ॥ जें धर्म-तत्त्व तें यांस गवसली किली ॥ किति कूप वापिका-देवालयें झांकिलीं ॥ परउपकाराची सिमा करुनि टाकिली ॥ अविरत पदनत कविरायाच्या न विसरावा रसीं ॥ ह्मणुनि दे सुत भैरव आरसी ॥ दाट साधु धृ० ॥ ३ ॥

## लावणी ४.

### विरक्ति.

रामजोशास कवितेमध्यें वैराग्यरस उतरण्याची हातोटी फार चांगली साधून गेली होती. तो मासला खालील कवितेंत रसिकांस पहावयास सांपडेल. संसारसंबंधानें विरक्ति व्हावी, एतदर्थ बोध या लावणींत फार चटकदार वर्णिला आहे.

हरि पद वंदा मग धंदा दुजा गोडरे ॥ धृ०॥ दो दिवसाची तनु साची धरा लाजरे॥निजहित साधा भवबाधा पळो आजरे ॥ धन सुत दारा मुडदारा करि बाजरे ॥ मन हें भुलतें नको भलतें करूं काजरे ॥ मग मुकाविल पाळी वन माळी महाराजरे ॥ जन भोंदाया बांधावा किती माजरे ॥ मद जिरवावा मिरवावा किती साजरे ॥ चाल ॥ असुनी डोळे झांक करावे ॥ रांडा पोरें कितीक भरावें ॥ काळमुखांमधें तनु पसरावें ॥ मग यदुपतिला त्या बळें विसरावें॥ नरतनु तुमची जाईल व्यर्थची फटफट मतिमंदा सुखकंदा मनि जोडरे ॥ धृ० ॥ १ ॥ उंच जराचा पदराचा किती झोकरे । किती धगडिचि पगडिचि पुरे नोकरे । नौबद खाना समजाना दुजा शोकरे । कीर्तनाचा भजनाचा तुझा पोकरे । हातर टाळा पर न विटाळा तुझी लोकरे । करिता जागा न बागा मग पाठिं फोंकरे॥ चाल ॥ नरतनु तुमची काय शिराणी । पाहतां ही तर निपट विराणी । कां भुलला मति करुनि दिवाणी । कोणी निजहित मनास नाणी । कविरायाची लटकि न वाणी । बळकट वंद्य करी नंदात्मजा ॥ धृ० ॥ २ ॥

## लावणी ९.

### विरहणी.

या लावणींत एका पतिविरहणीचें विरहोद्गार वर्णिले असोन शांत जोशीबोवानीं शृंगाराची आणि विरहाची केवळ मूसच आ-

नव दिली आहे आणि प्रास व यमकांचें केवळ भांडारच खुलें केलें आहे. या लावणींत जोशीबोवानीं इतर लावणी करणारांस उपदेश केला आहे कीं, ज्यांना कवन करून लावणी करावयाची असेल, त्याणें अशी लावणी करावी; नाहीं तर खुशाल लाकडं विकून पोट भरावें. कविता करण्याच्या फंदांत पडूं नये. ही लावणी चार चवकाची असून फार मोठी आहे. व फार सुंदर आहे.

साजणी समार्थे घरधणी नसत किति उणी युवति छावणी असुन कुणिकडे । अलिवर्षा परि न मनहर्षा झालि दुरदशा किं मदना पुढें ॥ ध्रु० ॥ चट उठावल्या घनघटा, पडति पटपटा बिंदु कटितटासि वळकट धरा । आतां पूर नद्यासि भरपूर येईल मग शूर कसा येतो घरा । हा पवन भयंकर भुवन सख्या विण अवन कोण करि पवन घनाहुनि चगा । ही शंपा मज भय कंपा देति कुणि संपादणी तरी करा । ही सर्द हवा घनगर्द करी उपमर्द मदन कंदर्प देत भडिमारा । हा कहर जातिचा बहर मदनाचि लहर येति सरसरा । घन घोर गर्जती मोर तिमिर वर जोर रात बहु थोर वाजे करकरा । सारे बिळांत नयन हे जळांत होतो पळपळांत जीव घावरा ॥ चाल ॥ किति संचित हिनमति वंचित मजगडे किंचित सुख नये दिसून ॥ अति सुंदर तनु कुच मंदर गिरिसम कुंदरदन काय असून ॥ अशि मंडित तनु केलि खंडित पति कुठें भुंडित बसला रुसून ॥ अकळंकित कुळ मनशांकित केलि तनु अंकित मन्मथ घुसून ॥ मणिहार सकळ तनुभार विकळ संसार

करिल कोण पार कठिण सांकडें ॥ किति चिं-
ता करूं भगवंता मनामधिं संतापुनि येतें रडें ।
॥ धृ० ॥ १ ॥ साजणी समयिं घरधणी० हा
विलास गडे दिलखुलास पसरुनि फुलास प-
तिसम तुला सहित कधि घडेल ॥ असा काम
मनांत जरि राम न घडविल ठाम कसा न सखि
उडेल ॥ सडिसाट नयन किति वाट पाहति
घनदाट अजुनि तरि हाट धरुनि शिघ चढेल ॥
ही रती कफालत सरती त्याचि मजवरतीच
संगत पडेल ॥ नाहितोक उदरिं किति शोक
करिती जन लोक कुणिगे तरी रडेल ॥ मला
पाय पतीचे सदुपाय गडेग त्याचें काय मज-
विणें अडेल ॥ घरिं दीर सासुचि किरकीर मज-
सि नसे धीर कधि तरी वीर पलंगीं चढेल ॥
मग भाळपदीं रतिकाळ नाहितर ताळ न गडे
कसा पडेल ॥ चाल ॥ माझि डंबर किति गडे
कंबर बसली सदंबर नको ह्मणे कुडी ॥ मेला
शंबर रिपु मानिं तंबर मजवरि शंभर शर हे
सोडी ॥ माझी बंडाळ कुठें घेउ धुंडाळ कसि-
रे चांडाळ दिधलिस बुडी ॥ असें कंजनयन
याला अंजन नाहिं मम रंजन कोण परवडी ॥
मन उदास कुणि पति पदास धुंडिल सुदास
पण जासुदास देइन कडी ॥ आले दुधार मन
गडे सुधार मग सुख उधार दुःख रोकडें
॥ धृ० ॥ २ ॥ कांहीं दोष ह्मणुनि पतिरोष
करिन संतोष त्याणें माझा होप सकळ उडवि-

ला ॥ कोण रांड मिळालि खटमांड तिणेंच
माझी सांड कराया पढविला ॥ किति नत्रम
करुनि बसुं दिवस व्यर्थ गेले दिवस कुणिग
आडविला ॥ कोण सवत केली भुतभवत तेणें
मन कुवत हृदयीं जडियेला ॥ माझी दशा क-
रुनि अशी खुशाल कुणि तरी उशा असेल सा-
रि निशा कैफ चढविला ॥ किति लवत होतें
मुख गवत धरुनि कोण सवत मिळालि तिणें
दडविला ॥ असा तर्क करिते परि अर्क सरस
तो गर्क कर्कश शब्द बोलुनि चिढविला ॥ कु-
ढकढीत चित्त धडधडीत देह कडकडीत अ-
णुग कढविला ॥ चाल ॥ मणिकुंडल देतें भुमं-
डल जरि कुणी धुंडल पतिसाठिं हिंडल निश्च-
यिं निका ॥ उरिं खंजिर जाणो लोहजंजिर
मज माणमंजर चरणीं नका ॥ माझी मंगळ त-
नु हे अमंगळ झालि मुखीं वंगळ पांढरफिका ॥
रति रंजित काचि सांजित मधुकर गुंजित गेल
किंग फुका ॥ हा कांत कठिण आकांत मदन
करि शांत नचरि वाकडें ॥ धृ० ॥ ३ ॥
तिचि रती सबळ भगवती पावली होति
ह्मणुन तिचा पती अचानक आला ॥ मग ग-
डबड तिचि मोठी लडबड गेली सारि चडबड
आनंद झाला ॥ होति मायबाप करित हायहाय
धरुनि त्यांचे पाय मग महालीं गेला ॥ झाली
भेट बसविली पेठ सुखाची लोट भेटला तिज-
ला ॥ मग हात धरुनि महालांत मंचकीं जात

अश्रु नयनांत सागर भरला ॥ ह्मणे भालि केली रांगोळी नित्य आंघोळी नयनजळिं झाली जिव कंठीं उरला ॥ अशि गळा पडुनि खळखळा रडली वेल्हाळा गहिंवर आला ॥ मग झाली पतिकर कर्षित मनिं बहु हर्षित रतिसुख दर्शित हेतु पुरविला ॥ चाल ॥ स्थिर जंगम त्याचा सुख संगम न पवति दंग मनांत मुसमुसी ॥ रतिच वेळ झाले नयनांचल मन्मथ मंचळ झुलत मानसीं ॥ कुचकुंभांकित परि भंगाहुनि तिच्या रंभा किति उर्वशी ॥ असें संकट हरिस कळंकट वारिल व्यंकट तरिच भरवसी ॥ कविराज काव्य सिरताज करिल कुणि आज याजहुनि साज निवळ चोखडें.तरि आदर,नाहिंतरि सदर, भरावें उदर, विकुनि लांकडें ॥धृ०॥४॥

## लावणी. ६.

### मानी नायकास विनंति.

ही लावणी कांहीं अंशीं वरच्या तोडीचीच, परंतु विषय थोडा निराळा असून लहान आहे. एक प्रिययुवति आपल्या सख्याची समजूत करून त्यानें घरीं यावें म्हणून विनंति करीत आहे. कविरायाची ही साधी व सहज लावणी झालेली असावी; परंतु यांत जो रस पाहिजे आहे तो हुबेहुब नामी उतरला आहे.

घडिभर तरि सदनासी ॥ येउन जा माझी असोसी ॥ धृ० ॥ कशि तशि खटनट पारि ॥ तुझी ह्मणवितें, पदीं तुझ्या तन मन धन झिजवितें ॥ तुला किती रति पति गति सुचवितें जिवाच्या तळमळीमुळें आळवितें ॥ होईन दासी ॥ धृ० ॥ येउ० स्वतपदींचें रज म्हणविल ॥

सख्या त्वां घरचः कीं वर्जिलें ॥ विरहानें दुःख पिकविलें ॥ तुझें मन कसें मज विषयीं निष्ठुर झालें ॥ रुसून बसलासी ॥ धृ० ॥ २ ॥ येऊन जा … ॥ परोपरीनें असा विनविला॥ नारी… आहुनि नेला ॥ सुख शयनीं प्रेमें भोगिला ॥ कविराय आनंदी झाला ॥ कवन हें सरसी ॥ धृ० ॥ ३ ॥

## लावणी ७.

### सद्बोध.

या लावणींत प्रपंची जनास सद्बोध केला आहे. त्यांचे बोधपर शब्द कडक रीतीचे असले तरी त्यांच्या कवितेपासून राग कोणाला येत नाहीं. ही एक अधिक खुबी जोशीबावांच्याच कवितेंत आढळते. इतरांच्या कवितेंत असला प्रकार क्वचितच आहे. जोशीबावांचे शब्द कितीही एकेरी आणि कडक असले तरी ते वाचकांस व श्रोत्यांस मृदु असे भासून उलट विषयीं जनांस उपरती देण्यात समर्थ होतात हा लहानसान चमत्कार आहे काय ? आह्मी ह्मणतों याचें उदाहरण खालील लावणींत आढळेल.

तनु दारोदार भरणाच्या पाईं गेली ॥ धृ० ॥ किति रांडांच्या प्रेमाला भाळलासी ॥ जन कामाच्या बाणानें पडे फाशीं ॥ चोरा पोरांच्या संगतीनें लया जासी ॥ त्वां नरजन्मीं येऊनि आपुली सोय कांहीं न केली ॥ धृ० ॥ १ ॥ सुख भोगाया लागसी भवाच्या पाठीं । परि सुख नाहीं ही खरी विषाची वाटी ॥ सावध करितों, मानवा तुला या साठीं ॥ दुष्ट संगतीनें खरी तुझी मति भ्रष्ट झाली ॥ धृ० ॥ २ ॥ मन सुमन करुनि हरीच्या पदीं वाही ॥ नाहीं

११ सं-भव्य ३१८

तरी वैरी हे तुला बुडवितील साही ॥ तूं आपुले जागीं नीट विचारुनी पाही ॥ कविरायाची वृत्ति नित्य हरि पाईं रंगेली ॥ धृ० ॥ ॥ ३ ॥

## लावणी ८.

### क्षणभंगुर वैभव.

ही लावणी लहानच असून वरचा मासला आहे. यांत मुमुक्षुस मोठा कटाक्षाचा बोध आहे.

कुणाची रमा ही मानवारे ? ॥ व्यर्थ कां भूललासी ॥ धृ० ॥ अनुदिनिं सांगतों तारे नुमजावें ॥ हरिपद सेवनिं वपु झिजवावें ॥ कांहीं तरी वेड्या हित समजावें ॥ अजुन कसा भरि भरलासी ॥ धृ० ॥ १ ॥ टिळा टोपी देवाचें गवाळें ॥ खालवर आसनाचे बोळे ॥ धनिकाचें भोंदुनि काढिलें दिवाळें ॥ काय उरें उरलासी ॥धृ०॥२॥ कुणाची दासी कुणाची जाया ॥ पोरें बाळें तशिच ही काया ॥ संसार हरिची माया ॥ कविराय पार्दि शरणासी॥वृ॥३॥

## लावणी ९.

### सारासारविचार, वैराग्य, आणि नीतितत्वबोध.

ही लावणी नीतिबोधत्वसंबंधानें आणि विषयी मनास परावृत्त करण्यासंबंधानें फारच चांगली आहे. जोशीबावांस वैराग्यरस किति करतलमलवत् होता याचें उदाहरण खालील लावणीवरून स्पष्टपणानें समजेल. लावणी वाचल्यावर किंवा ऐकिल्यावर थोडा वेळ तरी चित्तांत वैराग्य उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. अशी ही लावणी आहे. हें सज्जनांस वाचकांच्या ध्यानांत सहज येईल.

नर देहामधें येऊन गड्या त्वां हित केलें नाहीं ॥ दार धनाचा लोभ सोडशिल तर साधल तुज कांहीं ॥ धृ० ॥ हरिची माया अगाध जेथें ब्रह्मादिक फसले ॥ तूं तर मानव तनुचें पामर त्यांतहि कामादिक वसले ॥ नाना प्रकारचे विषय मनामधें येउनियां घुसले॥ काय तुझा तरि पाड गाधिज पाराशरादिक तळीं बसले ॥ या मदनावरि शुका सारिखे विरळे कुणि रुसले ॥बाकी नर या भवाब्धिमध्यें लोळती किति थकले ॥ या साठिं बा तुला सांगतों सावध मनिं राही ॥ रात्र दिवस उदकाहुनि चंचळ आयु जात पाही ॥ धृ० ॥ १ ॥ तूं ह्मणसि या संसारा मधें सुख पाहिन मोठें ॥ परंतु जितकें पाहसिल तितकें दृश्य सर्व खोटें ॥ अनुचित कर्मे आहेत जनाचीं भरावया पोटें ॥ अंतिं यमाच्या हातांत गेल्यावरि तूं कुणिकडे तनु कोठें ॥ तूं ह्मणसि मी चिरायु परि तो काळ मोजि बोटें ॥ ना आइकलें तरि जगति तळिं या विषम विषाची खिर घोटे ॥ विषय वासना धरसिल परि हे नागवितिल साही ॥ तुझिं इंद्रियें तुला बाधक होतिल परिणामीं दाही ॥ धृ० ॥ २ ॥ बाळपणामाधें तनु घालविली खेळुनिया सारी ॥ तरुणपणामधें बहार माजला रांड झाली प्यारी ॥ ते तर जातिल निघुन उद्या गड्या दिवस पहा चारी ॥ मग घालविसी बाहेर पैसा घरची झाली ह्मातारी ॥ तेही गेले

मग कोण पुसतो घरांत दमडी ना ज्वारी । रांड बिघडली फजिति झाली देणेकरि द्वारीं। अशा संकटीं कोण सोडविल तुझ्या मनाला ग्वाही ॥३॥ धृ० ॥ वृद्धपणामधिं पुत्रादिक. तुज ह्मणतिल कीं निबरा । आणिकही वाचसिल कुठवर करून जनाच्या किति कबरा । तुझ्या सुना तुज ह्मणती मेला ह्मातारा हा बहु लुबरा । उगाच पडे खाटेवर तुजला कशास न्हाण्या घर खबरा । शक्ति रहित तूं रांड घरांतुनि गळा करुनि जबरा । दरडाविल मग सोसून पडसिल त्यांचा सांभाळुनि उंबरा । जें झालें तें बरेंच झालें अजुनि तूं सावध होई । करुनिया मन सुमन शिघ्र कविराया पदीं वाही॥४॥धृ०॥

## लावणी १०.

### मानी गवळण.

ही गवळण लहानशीच आहे परंतु मोठी गमतीची आहे. हिचा एक चरण व्रिजभाषेचा केला असून एक चरण महाराष्ट्र भाषेंत आहे. यावरून जोशीबावांस व्रिजभाषाही परिचयाची होती असें दिसतें. या कवितेंत एक गवळण दुसरीस सांगत आहे कीं, इतर सान्या गोपी कृष्णास वश झाल्या परंतु मी कधीं वश होऊन आपल्या कुलास बट्टा लावणार नाहीं. कृष्ण मात्र जेव्हां तेव्हां माझ्या खोड्या फार करतो.

काय ह्मणावें मुलगा दिसतो, फार कठिण हा कर्म करी । मै तो चलीं जमुना नहनेको बीच

आय मोरि बाह पकरी ॥ धृ० ॥ काय करूं मेला कपटि गे बाई । कुंज गहनमों धूम मचाई । जावें उठून कुठें याचे पाईं । हाय ठरा जशोमतको कान्हाके ते बार बार मै तो पाव परी ॥ १ ॥ धृ० ॥ काय वदुं सारी अकीर्ति केली । संग सह लिया मै न आकेली । कोण अशा कर्मास भुकेली । सास बुरी परघर नागदिया ऐसि गुजपर आन परी ॥२॥धृ०॥रांड कुणी कुळ बुडविल खोटी । म न सोंहों ब्रख भानकी बेटी । शील बुडवूं नये हें भय पोटीं । काइ कहु कविरायकी लोण बात मिठीं बहु भूल परी ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी ११.

### होरी व रंग.

यांत एका गवळणीचें इतर गवळणींशीं बोलणें फार गमतीचें झालें आहे. कृष्ण नित्य कुंजवनांत गोपींसह होरी व रंग खेळत असतां एके दिवशीं कृष्णानें गोपींची फार दुर्दशा रंगानें केली. आणि त्यांच्याशीं मनासारख्या दुसऱ्या कांहीं शृंगारचेष्टाही केल्या. तेव्हां कांहींजणीस तें सहन झालें नाहीं. मग त्यांणीं निश्चय केला कीं, उद्यांपासून आतां कृष्णाच्या बोलावण्यास मान देऊन खेळ खेळण्यास यावयाचें नाहीं. त्यांत एक प्रमुख झाली, आणि बाकी ज्यांनीं तिच्या आज्ञेत वागण्याचें ठरलें. मग दुसरे दिवशीं ह्या गेल्या नाहींत, तेव्हां कृष्णाला ही गोष्ट समजून तो स्वतः जाऊन त्या मुख्य गोपीस भेटला आणि तिची समजूत करून तिला खेळण्यास घेऊन गेला. अर्थात् मग तिच्या मेळ्यांतल्या दुसऱ्या सर्व गोपी

खेळण्यास गेल्या. ही लीला कविरायानीं खालील कवितेंत फार मजेदार वर्णिली आहे.

दुर होय कान्हा आह्मी तुशीं खेळुना होरी ।
तुटली मर्जी तूं गर्जी नको बळजोरी ॥ धृ० ॥
कालच गडे म्यां याशीं केली होती बोली । शिवुं नये आंगा नको दंगा करुं वनमाळी । हातर ख्याली याची कोण जाणतो खोली । भिजल्या पोरी कशी होरी ग हे घर घाली । झुंबर करितो तिथें कोण कुणाचा वाली । केली गर्दी रंगाची सर्दी वोली । भरले डोळे बाई अजून जाईना लाली । फेडी लुगडी कुच रगडी या काय चाली ॥ १ ॥ धृ० ॥ अगे भिजली रंगामधें दंग जाहलें मी वेडी । तशा माजि बाई हा हळूच कंचुकी सोडी॥या खेळाची याला अशी कायगे गोडी । धूम करूनी भर गुलालांत संग जोडी । गडे हा करितो दुसऱ्याची टवाळी खोडी । माझी केली काल फारच ओढाओढी । मुक्तामणीचे माझे हार गळ्यांतील'तोडी । याच्या सगळ्या म्यां वळखून ठेविल्या खोडी ॥ २ ॥ धृ० ॥ डोळा नुघडे दुमदुमला रंगीत वेणू । गुंगींत होतें तों कर्णी ऐकिला वेणू । रंजित कुंजीं मधु मंजुळ रस मन रेणू । गर्दि उडाली काय सखे स्वमु-

खें मी वाणूं । तें दुःख सखये मग आमचें आ-
ह्मी जाणूं । आहे हा दिन कीं मध्यान्ह रात
हेंहि न नेणूं । बळकट होती कांहीं आयुष्या-
ची दोरी । ह्मणुनि वांचुनि आलों आह्मी सा-
सुरवासी पोरी ॥ ३ ॥ धृ० ॥ यापरि रुसली
घरीं बसली हरि समजावी । न कळत झालें
चाल तूं अशी न मी चिडवीं । खेळ खुशीचा
इथें मजि ग कां बिघडावी । दों दिवसांची स-
खी होरी रती पुरवावी । तूं मज वाली सा-
ऱ्यांनीं जुट बांधावी । बरि कीं माझी रंगांत
तनु भिजवावी । गोपी जमुनी कुंजांत मौज खे-
ळावी । तुजकडे आलों मसलत कांहीं सांगावी
॥ ४ ॥ धृ० ॥ ऐकुनि उठली खटपट मनाम-
धें होती । हरिचा धरिला तिणें हात नेला
एकांतीं । भोगिला पुरता मिळविली ज्योतिला
ज्योती । आंतून तिकडे वर यदुपतीला भर दे-
ती । मिसळून गेली भिजविलाच कंसाराती ।
गेली घेऊन मग कुंजवनाला हो ती । ऐशा ली-
ला करि आनंद तो अवतारी । त्याची होरी
कविराय गातसे थोरी ॥ ५ ॥ धृ० ॥

## लावणी १२.

### सवती मत्सरविलाप.

कृष्ण गोकुळ सोडून मथुरेस जाऊन कुब्जेशीं रत झाला, व

पून एक गोपी संतप्त होत्साता विलाप करीत आहे.तिचे ते उद्गार कविरायानीं खालील लहानशा चुटक्यांत वर्णन केले आहेत.

लाजुनिया न परतला—हा हरि दासिसंगें रतला
॥ धृ० ॥ ही मसलत अशी कशी त्याला सु-
चली । नायकिली कधीं अघटित उचली ।
वाईट कुबडी काय मनिं रुचली । खोटी चे-
टि साठीं गेला वाईट ह्मणवाया मथुरेला ॥१॥
॥ धृ० ॥ आह्मावरी हरि आतां बाई विटला ।
नंद यशोदा यांसही तुटला । येणें पुनरपि संश-
य फिटला । ज्याची त्याची साच वाणी हा
उजवाया लागला ॥ २ ॥ धृ० ॥ ठाऊक न-
व्हता असा हरि कपटी । केवढी याणें दि-
धली आपटी । यादव कुळीचें यश हा निपटी ।
जाती गोती बुडविली गाया कविराया ह्मण
आला ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी १३.

### गाऱ्हाणें.

या कवितेंत गोपी यशोदेस गाऱ्हाणीं सांगत आहेत. कृष्णाची पीडा इतकी झाली आहे कीं, गोकुळ सोडून अरण्यांत निघून जावें असें आम्हास झालें आहे. तूं नंदाची राणी आणि गांवची पाटलीण असून तुझ्या हांतून तुझ्या पोराचा बंदोबस्त होत नाहीं तेव्हां ह्मणावें तरी काय? आह्मी निलाजऱ्या म्हणून तुझ्या गांवांत राहिलों आहों इत्यादि कठोर आणि तुसड्या शब्दांनीं गोपी यशोदे जवळ गाऱ्हाणीं सांगून कृष्णाविषयीं तिरस्कार दाखवीत आहेत. हा भाव कवीनीं खालील पद्यांत फार सुरस साधिला आहे.

अग सखे यशोदेबाई मुल आपुला आटोपी ।
अशानें उडविल हा टोपी ॥ धृ० ॥ काय वदूं
जहाली सीमा तुझें गोकुल सोडावें । किती
तरि अपयश जोडावें । भल्याचा मुलगा यानें
गरतीस काय ओढावें । आतां काय कपाळ
फोडावें? ॥ चाल ॥ जळो जळो ही कटकट ।
अगगडे ॥ नित्य किती करावी वटवट । अग
गडे ॥ पोरीला चुंबितो मटमट । अग गडे ॥
ही सवय नव्हे सोपी । आमुचे पति आ-
हेत कोपी ॥ १ ॥ धृ० ॥ ही पुरे आतां
तुझी वस्ती काय उरली जिद्गाणी । नांदतों
परि लाजिरवाणी ॥ आज ह्मणविशी नंदाची
मुख्य तूं राणी । ऐकली का गाऱ्हाणीं ॥ चाल ॥
नित्य असा हा बिजवर । अगगडे ॥ सोसितों
आह्मी आजवर । अगगडे ॥ ही आली घोर-
पड तुजवर । अगगडे ॥ निघून चालल्या स-
र्वही गोपी । तुझा सुत तूं राहून खुशालीं द-
हिदूध वोपी ॥ २ ॥ धृ० ॥ अग बये करावी
हकमी धणि यानें रीतीची । अशी काय व-
हिवाट नीतीची । ठेवून दे दासी अग बये पा-
हुनिया सुरतीची । गोष्ट काढूं नये गरतीची
॥ चाल ॥ ही बाई काय खळखळ । अग अ-
शी ॥ रयतेची न घ्यावी तळतळ । अग अ-

शी ॥ 'लोटितों घडी पळ पळ । अग अशी ॥
कविराय न गुण लोपी । गातसे ऐकुनि मी
सोपी ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी १४.

### मध्यस्थी.

कृष्ण रंग रास खेळत असतां एक मानी गोपिका रुसून त्याच्या खेळास गेली नाहीं. कृष्णाच्या मनांतून ती यावी असें फार होतें, परंतु आली नाहीं. तेव्हां कृष्णानें एक चतुर व वकिली करण्यास योग्य गोपी पाहून तिला तिच्याकडे पाठविलें. मग तिणें तिच्या जवळ खूप गोड बोलून कृष्ण सुखाची प्रौढी गाइली. तेव्हां त्या मानी गोपीचें मन मोहून जाऊन कृष्ण सुखाची तिलाही इच्छा झाली. आणि शेवटीं ती आपला अभिमान सोडून कृष्णाकडे निघून आली. मग कृष्णानें तिचे हेतु पूर्ण केले. इतकें चरित्र फार खुबीदार रीतीनें खालील पद्यांत जोशीबोवांनीं वर्णन केलें आहे. यांत प्रासाची ठेवण मजेदार आहे.

आइक सखे गडणी । कुंजवनिं हरि होरी खे-
ळतो बसलिस निज भुवनीं । या वनांत नंदाचा।
नंदन करी आनंद थाट भवता अरविंदाचा ।
बाई तशांत रंगाचा । संगम यदुपति अंग भि-
जवितो बहर अनंगाचा । गडे रस नंदलाला-
चा । लाल गळ्यामधें लाल भडक कल्होळ
गुलालाचा । बाई लपेट पवनाचा । नाचतचि
मग करिती सुगंधिक हार तो सुमनाचा॥चाल॥
तूं अशांत झडकरी ऊठ । अगगडे ॥ रंगाची
होतसे लूट । अगगडे ॥ नको हरिसीं पाडूं

तूट । अगगडे ॥ तो कन्हया केवळ बूट । अगगडे ॥ घे गुलालाची भर मूठ । अगगडे ॥ घरच्यांनीं दिधली सूट । अगगडे ॥ तो तनननननन वेणुरवाची धुन मंजुळवाणी ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ आइक सखे गडणी ॥ सखे गुलाल पिचकारी । धरुनि करीं हरि मुग्ध गोपिका हळूच चुचकारी । करि कौतुक कंसारी । रास पाहशिल हरिशीं खेळशिल सुख तरि संसारीं । विरहिणीस तरवारी । कारंज्याचे फुवार धारा सुगंधतर वारी । बाई मधुकर वनचारी । कुंजांतचि गुंजारव करती हरि मुख संसारीं । तो अनंत गिरधारी । चंपक बकूल कुसुमघन वर्षती सुरवर नभीं भारी ॥ चाल ॥ मी आतांच आलें चाल । अगगडे ॥ तुज बाहतसे नंदलाल। अगगडे ॥ करूं नको जिवाचे हाल। अगगडे॥ श्री हरिचे पद धन माल । अगगडे ॥ रंग लूट झाली काल । अगगडे ॥ कां सोडून बसलिस बाल । अगगडे ॥ तुज हरिचा लागो ख्याल । अगगडे ॥ छौंन छननननननन नेपुर चरणीं नाचती गौळणी ॥ २ ॥ धृ० ॥ आइक सखे गडणी ॥ मग त्या सखिनें गोविला । अति प्रयत्नें रिझउनि नेलें तिलाच सोपिला । पाहतांच हरि तिजला । कवटाळूनि धरि काय

तियेचा वसनांकित भिजला । मग अनंग वळविला । त्याच गोर्पानें यदुपती रंगीं धरून मळविला । निज कामचि पुरविला । हरिपद पंकज विलोकनें तो स्वमान नुरविला । रति रास रंग सरला । कविराय मुखीं वर्णन ऱ्हाया शेष जगीं उरला ॥ ३ ॥ धृ० ॥ आइक सखे गडणी ॥

## लावणी १९.

### श्री रामाचें नाहाण.

कौसल्या बाळंत झाल्यावर परब्रह्म केवळ श्रीराममूर्ति सर्वांनीं पाहिली. आणि मग शाहण्या व वृद्ध बायांनीं तें मूल पायावर घेऊन न्हाणिलें. तेव्हांचा तो समारंभ मनांत आणून आमचे बुद्धिवान् कविराय काय म्हणतात पहा:—

त्या रामाला पायावर आबळा न्हाणीं हो ।
ज्याच्या पदिंचें तारीत जगाला पाणीं हो ॥
तो विश्वाला प्रसवला तयाची टाळू । माखून ह्मणती तान्हयासी भय न विटाळू हो ॥ १ ॥
जो गुरु केला शंकरादि सुरलोकांनीं हो ।
जो दैत्याच्या नुघडि तो नेत्र हांकांनीं हो ।
त्याच्या करूं ह्मणुनी फुंकिति कानीं हो ॥
॥ २ ॥ अनंत कोटी ब्रह्मांडें ज्या मधीं मातीं हों । करिती ज्याच्या पदरजासि नवस रमा ती हो । त्या कविराया निजपदिंची लाविती माती हो ॥ ३ ॥ धृ० ॥ त्या रा० ॥

## लावणी १६.

### रागीट गवळण.

एक गोपी कृष्णाच्या हातीं लागत नव्हती आणि कृष्ण त्याकरितां तिच्या डाई फार पडला होता. शेवटीं ती फार त्रासून कृष्णाचीं गऱ्हाणीं लोकाजवळ करूं लागली. तो प्रकार जोशीबोवांनीं हें पद्य सहज मुखावाटे सोडून दिलें असेल. परंतु आम्हाला तें फार मौजेचें व किंमतीचें झालें आहे यांत कांहीं संशय नाहीं.

हा हरि माझ्या ख्यालीं कां पडला ॥
हा हरि काय बोलूं ओंगळ मेला ॥ धृ० ॥
साथि मिळउनि दधि दुध हरितो। मातीं टा-
कुनि डोळे भरितो । रातीं येउनि छाति धरि-
तो । जाति गोति हातीं वाईट ह्मणावया बा-
ई भला ॥ १ ॥ धृ० ॥ हा हरि माझ्या० ॥
याचि नगरी बाई सोडून जावें । या घोरानें
किति कीं झिजावें । पापाविषयीं कुणि पुढें
व्हावें । पोटिं ओठीं खोटी बोलीं करित नि-
शिदिनीं रागचि माला ॥ २ ॥ धृ० ॥ बाळ-
पणापुन रांडा पटवी । याला लागली नाहीं
कुणि सटवी। यावस्तिहुनि बरि किंग अटवी ।
पोरी ठोरी गोरी काळी साऱ्या पाहुनि कवि-
राय बाला ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी १७.

### गवळण—खडखडीत दटावणी.

दहि दूध विकण्याकरितां मथुरेस एक गवळण जात असतां वाटेंत कृष्णानें तिला आडविलें, आणि हात धरिला. तेव्हां ती न भीतां मोठ्या दिमाखानें कृष्णास दटावणीचे शब्दानें बोलूं लागली. तो प्रकार खालील लहान चुटक्यांत आहे. ही लावणी सबंध सांपडली नाहीं. एक कडवें (चौक) सांपडलें तितकेंच येथें दिलें आहे. जोशी बोवांचा एकेक शब्द मोलाचा आहे. मग कडवें एकच असलें तरी मोलवान कां समजूं नये ?

मी सांगून चुकतें कान्हा । कर सोड मला हें दांडगेपण सोसेना ॥ धृ० ॥ जळो दह्या दुधाची चोरी । हें काय ह्मणावें दिवसां धरसी धोरी । या कर्में पडशील घोरीं । पतिबाट मला तूं करूं नको बलजोरी । धुंडून गोपिका गोरी । तिशीं गुलाल खेळसी होरी । तुझि उडेल अशानें थोरी । तूं जाण तुझें हें कर्म मला भावेना ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी १८.

### चटकदार सद्बोध.

ही लावणी फारच सुंदर साधली आहे. यांत प्रास साधण्याची शिकस्त दिसून येत आहे. आणि महाराष्ट्र व संस्कृत भाषा जोशी बोवांच्या किति आधीन झाली होती, हें या खालील पद्यावरून चांगलें लक्ष्यांत येतें. शिवाय प्राकृत व संस्कृत शब्दांची एका ठिकाणीं बेमालूम जोडणी करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत कसें सहजपणानें होतें होंही पण गोष्ट लक्ष्यांत आल्यावांचून राहत नाहीं. या लावणींत संसारिकांस ईशपदीं चित्त लावण्याविषयीं फार सुरस बोध आहे.

मंदा किति करशिल हा घरधंदा । विसरुन सु-

खकंदा ॥ धृ० ॥ सारा संसृतिचा हाच पसारा । सुत कैंचीं दारा । पाशवारां । तिल जैशा गारा । घेउनी विचारा । नारायण रे हा विश्व चितारा भज जगदाधारा ! कुंदा शंकुनि रसन मिलिंदा करसिल विषय छंदा ॥ ॥ १ ॥ धृ० ॥ रांडा मोहुनि तुज करतील बंडा ॥ रचुनिया कुभांडा । चंडाळा बुडविसिल सुकृत करंडा । हें अपयश पिंडा । गुंडा ह्मणविसि यमाच्या दंडा । कां घेसि वितंडा । सुंदा कां नेणसी त्या उपसुंदा । किति विषयीं धुंदा ॥ २ ॥ धृ० ॥ बापा कां धरसिल या भवतापा । किति जोडसी पापा । ज्यापाहुनि धरसी मन्मथ कोपा । मग करिसी विलापा । चापा परि होउनि नत अनुतापा । धरि शांति कलापा । छंदा या कृतिनें कवितानंदा । कविराय मुकुंदा ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी १९.

### प्रपंचांत सुख आहे काय ?

खालील लहानशा चुटक्यांत "प्रपंचांत सुख आहे काय ?" हें कवीराय प्रपंचिकास विचारतात. चुटका लहानच परंतु सुरस आहे.

या प्रपंचि सौख्य तुला काय रे ? ॥ धृ० ॥
देणेकरी ओढिती मुलें बाळें तोडिती । कर्कशा हे रांड ती साऱ्या वीळ भांडती ॥ १ ॥

मराठा ग्रंथ संग्रहालय
२५
ठाणे

॥ धृ० ॥ रोगें तनु पीडिती इंद्रियें हीं सोडि-
ती अनुभव या रीती कविराया जागती ॥२॥
॥ धृ० ॥

## लावणी २०.

### उद्धवाशीं गोपींचें भाषण.

कृष्ण मथुरेंत राहिल्यावर गोपींचें व नंद यशोदेचें समाधान करण्यास त्यानें उद्धवाला गोकुळास पाठविलें. उद्धव संध्याकाळीं गोकुळांत येऊन नंद यशोदेस भेटला. त्यांचें समाधान केलें. मग प्रातःकाळीं स्नान संध्येकरितां यमुनेवर गेला, तेव्हां गोपींची व त्याची भेट झाली. कृष्णाचा निरोप उद्धवाच्या मुखानें ऐकल्यावर मग गोपी उद्धवाशीं बोलू लागल्या. तें त्यांचें भाषण कविरायानें खालील पद्यांत फार सुरस वर्णिलें आहे.

आहा । या हरिनें उद्धवारे काय केलें ! ! ॥
॥ धृ० ॥ आतां कसें काय आह्मीं गोकुळिं
बसावें ।असें त्याला एक वेळा जाऊनि पुसावें।
दासीपाशीं गुंतला तो आह्मीं न रुसावें । आतां
काय राहिलें हो सारें यश गेलें ॥ १ ॥ धृ० ॥
आह्मा नाहीं वाटला हा घातुकी परावा । अ-
सा याणें बायकांचा घात न करावा । याचे
मनीं आज कांहीं स्नेह न उरावा । कैसें दैव
गोपिकांचें पुढें उभें ठेलें ॥ २ ॥ धृ० ॥ वट-
कांनें आज केला कीर्तिचा चुराडा । त्याचि
सवें आमुच्या या हाडांचा सिराडा ।कसा ति-
णें घातला हो मोहाचा गराडा । अक्रुरानें याच

३

साठीं कविराया नेलें ॥ ३ ॥ आहा ! या ह-
हरिनें ॥ धृ० ॥

## लावणी २१.

### विरहातुर गोपिका.

कृष्ण मथुरेस जाऊन राहिल्यावर एके दिवशीं एका गोपीची आणि दुसऱ्या गोपीची वाटेंत भेट झाली ! तेव्हां एकीनें दुसरीस कृष्णाचें कांहीं वर्तमान आलें आहे काय ह्मणून विचारिलें; तेव्हां तिला ती उत्तर देऊन त्यांत आपली कृष्णावांचून झालेली दुःखद स्थिति आणि कृष्णाचें थोडें बहुत मथुरेकडील वर्तमान सांगती झाली. हा भावार्थ जोशीबावांनीं खालील छंदांत मोठा बहारदार वर्णिला आहे.

या हरिसाठीं मी जाहलें पहा वेडी ॥धृ०॥वाटे घ-
नशाम माझ्या डोळ्यापुढें बाई । प्रपंचांत जिव
नाहीं करूं तरी काई । लौकिकाची रीत सारी गे-
ली त्याचे पायीं ।गेला बाई सोडुनि कुठें पाहूं गां-
वखेडीं ॥ १ ॥ त्याचें काय जाई जिथें गेला
तिथें राजा । आह्मी मूढ याच्या नादीं परा-
व्याच्या भाजा । गरिब गाई गोपी त्यांच्या
आला नाहीं काजा । आहे ऐकतों रांड कुणि
मिळविली तेडी ॥ २ ॥ धृ० ॥ सासु आणिं
सासऱ्याची वाईट मी झालें । याच्यामुळें दाद-
ल्याला कधीं नाहीं भ्यालें । लौकिकाची चाँ-
ड नाहीं अपवादा प्यालें । कविराय हाच
याचा उपकार फेडी ॥ ३ ॥धृ० ॥

## लावणी २२.

### प्रियसख्याला विनंति.

एक प्रियतमा आपल्या प्रियकराला घरीं येण्याविषयीं विनंति करीत आणि त्याला रुसण्याचें कारण विचारीत असून त्यांतले त्यांत आपली स्तुति, स्थिति आणि दुःख त्याला जाणवून शिवाय शृंगार रसाचा हावभाव आणि लालूच दाखवीत आहे. हा प्रकार खालील लावणींत कविरायांनीं मजेदार दाखविला आहे.

घडीभर याहो माझ्या घरासी राया ॥ धृ० ॥
कां मन आपुलें खवळुनि जातां ॥१॥ मी नव्हें
कामिनी तसी गुणवंता । किति मज गांजावें
सख्या गुणवंता । बिन अपराधें कां दुखवि-
तां। मी वंदितें आणि तुमच्याहो पायां ॥१॥
धृ०॥ टाकुनि देतां कां ममतेला । दीन जनावरी
कां हट केला । कोप कशामुळें हा मनिं केला।
नवतनु संगमीं मदन भुकेला । रंग हा घ्या
तुम्हा जोगा भोगा काया ॥ २ ॥ धृ० ॥
संग न हो परि बोला मृदुवाणी। हास्य करुनि
पहा मी तुमची राणी । माझ्या कधि ना तुटे
डोळ्याचें पाणी । तव गुण गातें अभिनव गाणीं।
याकिहो कविराया हा घ्याला वायां ॥३॥ धृ०

## लावणी २३.

### हळहळ ! !

गोपी कृष्णावांचून अगदीं बेहोष होऊन तळमळ करूं लागल्या ! अशा स्थितींत पूर्व स्थितीची म्हणजे कृष्णसंगम सुखा-

ची आठवण होऊन तर त्यांची विलक्षणच स्थिति झाली. आणि मग एकमेकींस म्हणूं लागल्या. तें त्यांचें भाषण जोशीबोवांनीं खालील चुटक्यांत गाइलें आहे.

" आतां काय आह्मी हरिवांचून राहूं । प्राणसख्याला कधीं पाहूं ॥ १ ॥ धृ० ॥ आतां काय मुरलिचा ध्वनी साहूं । कुंजवनींची गेली हाहू ॥ १ ॥ धृ०॥ आतां काय यमुनेमध्यें नाहूं । कृष्णपदींचें सुख लाहूं ॥ २ ॥ धृ० ॥ प्राण चालला गे साजणी । आतां मेलों सोसेना जाचणी ॥ ३ ॥ धृ० ॥ झाली बहुत जिवाला जाचणी । कविराया भेटिची मागणी ॥ ४ ॥ धृ० ॥ आतां काय आह्मी हरिवांचून राहूं ॥ प्राणसख्याला ॥

## लावणी २४.

## वैराग्यपर बोध.

शृंगार, वैराग्य, विरह आणि भक्ति हे सारेच रस जोशीबोवांस करतलवत् होते. खालील पद्यांत वैराग्याविषयीं अगदीं सहज बोध केला आहे; पण तो किती साधला आहे पहा.

या भवांत सुख पाहसी हें काय ? ॥ धृ० ॥ श्रम दिननिशीं किति करसी । कधिं हरिपद गंगेंत नाहसी । मन करुनी सुमन कधिं वाहसी । हरिपदिं होउनी गाय ॥ १ ॥ धृ० ॥ हितवाति नरतनु, विफल गमावुनी । भुललासि

किति तरी वैभवविपिनीं । फटफट निशिदिनीं खपटप व्यर्थचि जाय ॥ २ ॥ धृ० ॥ नटशिल किति जनीं । अभिमान उभा मनीं । कार्य होसि नम्रपणीं शरण कविराय ॥ ३ ॥ धृ० ॥ या भवांत सुख पाहसी हें काय ॥ १ ॥ धृ०॥

## लावणी २९.

### खडखडीत ताकीद.

कृष्ण-त्रासानें गोपी फार त्रासल्या. एके दिवशीं साऱ्या जणींनीं एक कट करून कृष्णाला घेरला. आणि खूप संतापानें खडखडीत रीतीनें धमकावणी देऊन त्याची कानउघाडणी केली. हीं गोपींचीं दटावणीचीं भाषणें जोशीबोवांनीं खालील लावणींत फारच सुरस वर्णिलीं आहेत. ही लावणी फारच उत्तम साधली आहे. ही लावणी म्हणतांना किंवा वाचतांना असें वाटतें कीं, हुबेहूब प्रत्यक्ष आपण गोकुळांत आहों, व कृष्णगोपींचा संवाद आपणापुढें प्रत्यक्ष होत आहे! इतकें देहभान जोशीबोवांच्या काव्य कृतीनें हरपून जाऊन अंतःकरण तल्लीन होतें.

नका हरि हा दंगा करूं । या कर्में नाहीं बरें रयत ही धन्याचें लेकरूं ॥ धृ० ॥ आह्मी पुरगव क्याच्यासती । छीः ह्मणतो तुझि खोड जाइना अजुनही श्रीपती । सोसावे दुर्गुण किती । दैवानें दिली सुजन भोगितो रीतिनें संपत्ती । ही सोडून दे दुर्मती । तूं ह्मणसिल मी धनी नगराचा वाईट आमुचे पती । कर जोडितों तुझी हे वास्ति पुरे पुरे बापा । सारि रयत सुखा-

ची कोण तुझ्या सोशितो अशा तापा । या छंदामधें नको शिरूं । सांगतसों इतक्यावर तुजला मारूं किंवा आह्मी मरूं ॥ तुज न्याय नसे च्यारटा ।जारपणादिक वाईट कर्मं तुजपाशीं ॥ १ ॥ धृ० ॥ सोरटा । काय चांगट तरि गोरटा । पुरुषा एवढा पुरुष असुनि तूं खेळसी काय पोरटा । नव्हे तान्हा शिशु पारठा । नित्य रमविसि स्त्रिया दिससि तूं तरी एवढा-सा कारटा ॥ चाल ॥ पोर ह्मणों तरी साऱ्या गोकुळ नगरांत भोगिसि रमा । थोर ह्मणों तरी नित्य यशोमतिचा घेसी मुखामधें आमा । किति अभिनव सांगत फिरूं । या नगरिमधें अशा रीतिनें राहीना पाखरूं ॥ २ ॥ धृ० ॥ तुझी संगत ही भोंवली । या साऱ्या रडतात गर-तिच्या बाटविल्या त्वां मुली।काय वाढविसिल हा कली । काय वदूं ही कीर्ति तुझि या जगतामधें फांकली । कांहीं रीत नच राखली । पाप उघ-ड करूं नये भ्रमाची मूठ बरी झांकली ॥ चाल ॥ जातों येथुन आतां परि मोडूं खोड ही तुझी चोरा । उद्यांवरता कोणि हुकमाचा लोक करितसे जोरा । आह्मी तुझ्या जरि भारें मरूं । तूं मोठा कविराय ह्मणविसिल आज उद्यां तुज धरूं ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी २६.

### अगदीं त्रासाचें गाऱ्हाणें.

एक त्रासलेली गोपी दुसऱ्या गोपीस भेटून कृष्णाचें गाऱ्हाणें सांगूं लागली. तिचें हें गाऱ्हाणें फार निकराचें असून जोशीबोवांनीं तर त्यांत शब्दचातुर्याची अगदीं सीमाच करून दिली आहे.

बाई नंदाचा मूल माझ्या डायीं अगे डायीं ।
आतां पडला मी करुं तरी काई ॥ धृ० ॥
माझ्या घरच्यांची फार कठिण मर्जी । याला नुमजे हा बायकांचा गर्जी । हात जोडुनि मी किति करुं अर्जी । सासु माझि कोपाग्नीमाजि भर्जि । असा कोणि नाहींच याला वर्जी । हाच झाला गोकुळांत काय फर्जी ॥ चाल ॥ आतां उरली ती काय जिंदगाणी । याच्या कीर्तिची किति गाऊं गाणीं । कुणापाशीं सांगावीं गाऱ्हाणीं ।गांव सोडुन जाउं याच्या पायीं । बोलूं जातांना हा करितो गे घाई ॥ १ ॥ धृ० ॥
दिवा राति हा सर्व काळ जाची । सिमा झाली याचिया काळजाची । तुला सांगूं मी गोष्ट मानसाची । याला नाहीं कांहीं रीत माणसाची ज्याला गोडी लागेल ज्या रसाची । त्यांत पटकी पावेल ज्यार साची ॥ चाल ॥ घात मोठ्यांचा यास झोंबल्याचा । विश्वामित्रादि ऋषी सोंवळ्याचा । पाड किति तेथें या गोव-

ळ्याचा । लेश नाहीं यासी तो मोवळ्याचा । याणीं चारावीं वांसरें आणि गाई । मला झों-बावें काय अहागाई ॥ २ ॥ धृ० ॥ दह्यादु-धाची असो जळो चोरी । माझ्या रडवितो धरुनियां पोरी । अधिक बोलावें यांत काय थोरी । उगा दाखवितो हाकिमीचि तोरी । साऱ्या गोपींमधें मीच काय गोरी । मज म्ह-णतो चल जाऊं खेळूं होरी ॥ चाल ॥ नित्य याचा हा जाच कोण सोशी । जावें येथुनिया दहावीस कोशीं । भला हटकी परक्यान बा-यकांसी । मायबापाचा लाड याला पाहीं । काय घालूं कविरायजिची द्वाही ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी २७.

### बाजीराव पेशवे.

या लावणींत बाजीराव पेशव्याचें वर्णन आहे. बहुतकरून हें वर्णन थोरल्या बाजीरावाचें असावें असें आमचें मत आहे. प-रंतु यांतील दोन गोष्टींच्या उल्लेखावरून हें वर्णन शेवटच्या बाजी-रावाचें असावें अशीही कल्पना बरोबर बसते. शिवाय जो-शीबोवांचा हयात काल आणि शेवटच्या बाजीचा हयात काळही एक समयींच होता. याप्रमाणानें वरील पहिलें आमचें मत निरा-धार ठरतें. असो, कसेंही असलें तरी जोशीबोवांच्या वर्णन-चातुर्यांत कांहीं कमीपणा येत नाहीं.

प्राकृत म्हणती बाबासाहेब बाजिराव पेशव्या। असो परिशुभ कर्मानि लेशव्या ॥ धृ० ॥ दा-

ता शूर गुणज्ञ दयार्णव सत्यशील त्यापरी। नृपोत्तम कैचा पृथ्विवरी। सदैव धर्म संमृद्धि प्रतियुगीं जो खल जन संहरी। तोचि हा जाणा हर कीं हरी। मनुवंशामधें अवतरला परी तेज अमानुष धरी। पहाहो ऐका थाची परी। रम्य वसति या राजऋषींची पुण्यनाम ही पुरी। करिती स्वर्गश्रीची सरी। येथें नाना भोग भागितो जसा जनक मंदिरीं। आपुल्या अलिप्त अभ्यंतरीं। खंड दंड कधि घातपात जो युद्ध विरुद्ध न करी। वेगळ राहुनि दुर-चेदुरी। देति पाद आसमुद्र ज्याचे सेवक रि-पुच्या शिरीं। जयाचें तेज सागरोदरीं। ज्याची सत्ता धरूनि वागती लोक कलकत्तावरी। फिरंगी कर ताडून घे उरीं। आपण कोठें न हालतां हें यश मनुष्याचें करीं। कसें हो धुंडत येतें वरीं। यासाठीं ही तनु रायाची भगव-दंश भूवरी। विचारूनी शोध करा अंतरीं ॥ चाल ॥ हा प्रजापालनीं दाशरथी नृप ह्म-णा। परि तोही अयोध्या सोडुनि गेला रणा। निजकरें साधिलें यश मारुनि रावणा। हा पदींच राहुनि अरिचा मद करी उणा। प्रभु मनुज नव्हे हो अवतारांमधें गणा॥ याहुनि पुढती कविराय याच्या वर्णुनि कीर्ति नव्या।

तोषविल नृप मुकुटाच्या रव्या ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ १ ॥ दाता भगवद्भक्तशूर हा गुणत्रयें शोभला । धुंडितां यास मिळेना तुला । मग म्यां भारतपुरुष तिघे त्यामाजीं भीष्म योजिला । परंतु न याचे उपमे दिला । शूर भागवत खरा न दाता म्हणवून म्यां वर्जिला । दुजा मग कर्ण मनीं आणला।तो तरि दाता रणपंडित परी भक्ति गुणें वाळिला । असा तो कर्णही परि टाकिला । तिसरा याच्या उपमेकरितां धर्मराज पाहिला । गुणद्वययुत परी वीर्यें ढिला। तिहीं गुणानें तिघे उणे हा त्रिगुणात्मक येकला । मिळेना याची उपमा मला । काय धेनु चिंतामणि कल्पद्रुमगण देतो फला । खरा परि जरि आर्धं याचिला । दीनबंधू बाबासाहेब दैवानें बोळला । पाहिजे मग घ्या संपत्तिला । अचाट देणें याचें थोडें ह्मणतां बहु लाभला । जसा श्री सांबन्हि उपमन्युला । तेज पाहतां दादासाहेब याणें आराधिला । रविच हा तदुदरिं जन्मा आला ॥ चाल ॥ हा जगद्वंद्य आनंदवल्लिचा तुरा । कोणता शुभेच्छू न ह्मणेल मस्तकिं धरा । या अवतंसानें शोभविली हे धरा । युक्तिनें रक्षुनि जन रिपु केले चुरा । हा सुदैवशालि नृप मसलातिचा

पुरा । गेले यासि विषम करुनि जे त्यासि देतो शिव्या । तयांच्या स्त्रिया फिरतिल नागव्या ॥ २ ॥

## लावणी २८.

### गोपीविलाप.

अक्रूर गोकुळास येऊन कृष्णास घेऊन मथुरेस जाण्याची तयारी झाली, तेव्हां एक गोपी दुसऱ्या गोपी मिळवून त्यांस ही कृष्ण जाण्याची बातमी सांगूं लागली. तें तिचें सांगणें कविराय खालील चुटक्यांत वर्णन करीत आहेत. लावणी फारच सुंदर आहे.

हरि मथुरेला आजि कां गडे जातो ?। कांहीं कळेना कधि परतुन येतो येतो ॥ धृ० ॥ आह्मी तरी गोपी हरिवांचून मेलों । दंडधराच्या घरीं गेलों गेलों । अक्रूर मेला याला पाहुनि भ्यालों । कांहीं सुचेना दंग झालों झालों । दिनानिशि आतां विरहातुर बसलों । काय करावें नाहीं धालों धालों ॥ चाल ॥ शाम सखा कोपलागे अंतरीं । पहा याणें सोडिलें आपणास सुंदरी । प्राण आतां मोकळा वाऱ्यावरी । हाय हाय बोलूं काय कविराय विनवणी करतो ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी २९.

### रघुवीर.

ही लावणी संस्कृत रचली आहे. जोशीबोवांस संस्कृत भा-

याही चांगली परिचयाची होती हें खालील संस्कृत पद्यावरून वांचकांच्या लक्षांत येईलच. यांत श्रीदाशरथी रघुवीरास भजण्याविषयीं बोध केला आहे. संसारतापापासून मुक्त होण्यास रघुवीर भजण्याशिवाय दुसरें स्वल्प साधन नाहीं. याकरितां संसारादिक संपूर्ण विषयांवरून अंतःकरण मोहनिर्मुक्त करून दाशरथी रामाकडे लावावें असा या पद्यांत भावार्थ आहे.

अई भज मानव रघुवीरं । निशिचर–रणधीरं ॥ धृ० ॥ श्रममिह मा कुरु दारवने । किं तव सुख जातं । किं भ्रमणादिह कालवने कुरुते निजघातं । नहि करुणा सहसा मदने । पश्यसि किमुपातं ॥ चाल ॥ तापादपसर दुर्मते । सुरतांगीकृतकामं । संतत वदमिति संसृतौ । मां तारय भो राम । मुनिजनमानस रतिकीरं । पावनपदनीरं ॥ १ ॥ धृ० ॥ नान्यदुपायांतरमधुना । चिंतांबुधितरणे । जीवति राधाधरमधुना । कःखलु का मरणे । दिनमणि वंशांबुधि विधुना । कृतमभयं शरणे ॥ चाल ॥ वरतनुरियमिह राजते । त्वयि नर सुकृत भराते । प्राप्तमपित्वं दुर्मतेरमृतं त्यजासि कराते । सुललित पीतोत्तम चित्रि भुवनं गभीरं ॥ २ ॥ धृ० ॥ कुरु नर कामादरिदमनं वयसि नरय तरले । दशकरणानामाक्रमणं । क्वचिदिह भुवि विरले । धनमिति माया नयवमनं । पश्यसि मधुगरले ॥ चाल ॥

मोहं जहि वनमालि नोचरणे शरणं याही। व-
दवदनादिति दुर्भवे दशरथसुत मां पाही। क-
विरायालंकृतहीरं दर्शितभवतीरं ॥ ३ ॥
धृ० ॥ अई भज मानव रघुवीरं ॥

## लावणी ३०.

### गाऱ्हाणें.

कृष्णानें फारच त्रास दिल्यामुळें एक गोपी यशोदेजवळ गाऱ्हाणें सांगू लागली. तें गाऱ्हाणें कविरायांनीं खालील पद्यांत घेतलें आहे. चुटका लहानसाच, परंतु चमत्कारिक आहे.

यशोदे बाई मूल तुझा अनिवाळ ॥ धृ० ॥
जितक्या गोपी तितक्या टकळी। ह्मणसि तु
च्चिमणा बाळ ॥ १ ॥ धन्य अशाला व्यालिस
गाई। गोप वधूचा काळ ॥ २ ॥ गोकुळ न-
गरें कसें नांदावें। कांहीं न उरला ताळ
॥ ३ ॥ पाहुनि वाटतो घातुक या परि।
बरवा काळा व्याळ ॥ ४ ॥ तुज लडिवाळा
कविरायाचा। जातो कैसा चाळ ॥ ५ ॥

## लावणी ३१.

### माधव.

यांत जोशी बोवांनीं श्रीमाधवास शरण जाऊन नृजन्माचें सार्थक करून घेण्याविषयीं फार कटाक्षानें बोध केला आहे. ही कविता अगदीं सरळ असून अर्थ अगदीं उघडा व सर्वांस समजण्यासारखा आहे. या पद्याची भाषाही केवळ साधी आहे.

कारे मनिं माधवासी शरण रिघाना ॥ किति कथितों हित कांहीं कराना ॥ धृ० ॥ नरतनु लाधली हें सुकृत भरानें । हारवितां अपुल्याचि करानें । चंचळ मन नोहे स्थिर निकरानें । हें वदति श्रुति शास्त्र पुराणें । झडकरि संभाळावें हित चतुरानें । व्यर्थ कसें भ्रमतां तिमिरानें । अंतःकरणीं या मदन शरानें । भंगुं नये परमार्थ मरानें । सुरपति मोहिला विषय गरानें । शाप दिला मुनिच्या कुमरानें । सुतदारादि हे बहु आदरानें । वंचति तें नुमजावें खरानें । या भव सिंधुच्या लहरीं तराना । हरिगुण कीर्तनीं रंग भराना ॥ १ ॥ धृ० ॥ भगवत् भजकासीं संग धरावा । तच्चरणीं निज देह पडावा । जो तो नर भवा माजिं बुडावा । मग कैसा परमार्थ रडावा । श्रीगुरु चरणिंच्या नमुनि खडावा । हरिहर नाम सुमंत्र पढावा । हें न करावें जेणें मदन चिडावा । सत्पथ हा तरी कां बिघडावा । अरे तुमचा डोळा कधीं उघडावा । साधक हो मनिं भाव जडावा । कां भवपाशिं हा देह पिडावा । मग भजनें सगळाचि मढावा । हरिगुण गायकाच्या हृदयीं शिराना । सुखकर हा कविराय वराना ॥ २ ॥ धृ० ॥

## लावणी २९.
### रुक्मिणी.

श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी आपल्या सखीस आपल्या लग्नाची हकीकत सांगत आहे. हें चरित्र जोशी बोवांनीं खालील लावणींत फार सुरस वर्णिलें आहे. परंतु ही लावणी पूर्ण सांपडली.नाहीं एकच कडवें म्हणजे एकच चौक मिळाला, तितकाच तो फार गोड असल्यामुळें येथें बरें वाटलें ह्मणून तसें केलें आहे.

ह्मणे रुक्मिणी सुदेव बाई पाठविला म्यां खरा। परि कधिं येईल वृद्ध मित्र हा मनामधें खराखरा ॥ धृ० ॥ तो दिन गेला रात पातली काय सांगुं मी तुला ॥ चैन पडेना असूग माझा कृष्णपदीं गुंतला । ताताडि बहु दादाचि त्याणें हळदि लाविली मला ॥ देऊं केलें मज त्या मेल्या चैद्यपतीच्या मुला । म्यां त्या रातीं केला जीवित संकल्पाचि आपुला । दुःख सांगतां नये मनांतिल बापाला आईला । रात जातसे तों तों जिव हा धडधड करुं लागला । अश्रु वाहती नयनीं सखये गळा भरुनिया आला । त्या मेल्यानें समारंभ लग्नाचा मंडप दिला । कुंडन नगरीं उत्सव मन्मनीं दुःखाचळ वाढला ॥ ॥ चाल ॥ गडे काय सांगुं या कर्माची काहाणी । अवकाश थोडका दादा मज नाहणी । परि समयिं झालि सुदैव गति लाहणी । मी पाय पहाया पहिल्यापुन शाहणी । उघडून

दृष्टि जों करुं गेलें पाहणीं ॥ अकस्मात तो
दृष्टिस पडला जसा हरवला हिरा । विप्र मु-
खश्री कळवीं मजला यदुविर आले घरां
॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी ३३.

### कलियुगांतील संत.

जोशीबोवा खालील आपल्या पद्यांत संताविषयीं बोलत आहेत. कलियुगांत खरे संत थोडे असें त्याचें मत आहे. व जे आहेत, ते खालीं लिहिल्या प्रकारचे आहेत. खरे संत थोडे आणि ढोंगी व ढोंली पुष्कळ हें आपलें म्हणणें ते गाऊन दाखवितात तें असें:—

संत थोडे थोडे थोडे थोडे ॥ धृ० ॥ कलिरा-
जाचे राज्य पहा हो । यतिस बसाया घोडे ।
उंट पालख्या लाल बनाती जोडे जोडे जोडे
जोडे ॥१॥ धृ० ॥ तुळसी काष्ठें गळ्यांत असुनी
दार धनाचे ओढे । नेणति कांहीं पाया पडती
खोडे खोडे खोडे खोडे ॥ २ ॥ धृ० ॥ त्यास
कसेहो कविरायाचे शब्द लागती गोडे । अ-
पक्व जन बहु जगांत हिरवे दोडे दोडे दोडे
दोडे ॥ ३ ॥

## लावणी ३४.

### गाणें.

कृष्ण त्रासानें त्रासलेल्या एका गौळणीची आणि कृष्णाची एक दिवस गांठ पडली. तेव्हां मोठ्या रागानें आणि त्वेषानें ती

त्याला धमकावून व धाक दाखवून बोलली. तिची अशी समजूत होती कीं, अशा प्रकारें रागें भरलें असतां कृष्ण पुनः आपल्या वाटेस जाणार नाहीं. हें तिचें धमकावणीचें बोलणें कविरायानें खालील पद्यांत सुरस रीतीनें वर्णन केलें आहे.

धीर धरी नंदाच्या पोरारे ॥ धृ० ॥ काय हाखेली माय तुला व्याली कृष्ण सर्पा जशी विषालि व्याली । चोर जार परद्वार बाहेर ख्याली । घट घट दधि मट मट गिळि फट फट जळो कटकटरे ॥ १ ॥ धृ० ॥ दुष्ट जन्मलासि जळो तुझी मस्ती । तू तर दांडगा मी रांड मशि कुस्ती । कशी टिकल गोकुलचि हे वस्ती । धडधड करि हृदय झटसी कडकड किति बडबडरे ॥२॥ धृ० ॥ गुरें वळ जा घेउनि हातीं काठी । काय समजुनी लागसी माझ्या पाठी । तुझी ठाव आहे कविराय मुखें धाटी । उठउठ किति हटतट वदूं खट नट करुं सटफटरे ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी ३९.

### प्रेमसंगम.

खालीं दिलेली लावणी फारच मजेदार आहे. परंतु दुर्दैवानें ती आम्हास पूर्ण मिळाली नाहीं. शेवटचें कडवें म्हणजे शेवटचा चौक मिळाला तितकाच येथें दिला आहे. परंतु तेवढ्यानें या सर्व लावणीची किंमत रसिक वाचकांच्या सहज ध्यानांत येणार आहे.

अहो सख्या जिवलगा । काय अंतर पडलें

सांगा। मी दासी तुमची मजला मागा ॥ धृ०॥ असो त्याणें रुजु धरली । मग सदयपणें अनुसरली । करिं धरून सुहृज्जन फुलबाडीं मधें शिरली । मनाचि गति पुरली । सांगाया गोष्ट नाहिं उरली । आनंद जळें दोघांचीं लोचनें भरलीं । रसामधें तरतरलीं । कांहीं दिवस होति अंतरलीं । ती युवती मदन रगांत परोपरि चुरली ॥चाल॥ विषय तरि रतिजोगा । असा विरळ येखादे जागा । कविराय म्हणे तें प्रेम घरोघरीं कांगा ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी ३६.

## प्रियकरणीस विनंती.

एक प्रियकर आपल्या प्रियेची फार दिवसांनीं भेट झाल्यामुळें विनंती करीत आहे कीं, आतां माझ्यानें धीर धरवत नाहीं. कसेंही करून मला प्रेमालिंगन दे, व माझा विरहानळ शांत कर. असें म्हणून तिच्या स्वरूपाची प्रशंसा आपल्या गरजेची किंमत तिला कळवित आहे. हा प्रकार कवीरायांनीं खालील संस्कृत पद्यांत फार सुरस वर्णिला आहे.

तरुणि तवेदं कुचतटि मति गुरु कुरु ममहृदि सादरं । मनो मे भवति मनोभवदरं ॥ धृ० ॥ अधर मधुर मधुरस रसिक मामुज्जीवय तावकं । प्रिये मे शमय विरह पावकं । मुंचति मदनः स्वीकृतकदनो मयि विषमं सावकं । निवारय तं सखि रतिनायकं । कोपादरुणं कुरु मयि

करुणं रुचि निर्जितधावकं । दगंतं पाहि निजं सेवकं । जहि जहि मानं मात्रज मौनं अनु कुरुषे किबकं । त्वादियं लपितं सुखयति न कं ॥चाल॥ त्वं मुधा भजसि मयि रुषं कि-मिति कातरे । किं कृतं मया वर भामिनि रुचि-राधरे । कुरु कृपामरुण रुचि पल्लव कोमल-करे । साहसं किमिदमति कोप भरे मंथरे । मंजुल तर मृदु सिंजित मणिमय मंजिर च्युति-धरं । नतोहं तावकपटपुष्करं ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी २७.

एक गोपी दहि दूध घेऊन मथुरेस विकण्याकरितां जात असतां तिच्या सोबतीच्या गोपी लवकर चालून पुढें गेल्या आणि हीच थोडी मंद चालीची असल्यामुळें मागें राहिली तितक्यांत तिला कृष्णानें गांठून आडविली. तेव्हां ती गोपी कांहीं रागानें, कांहीं आर्जवानें आणि कांहीं समजुतीनें त्याची मन मर्जी राखून निघून जाण्याविषयीं ह्मणजे कृष्णाचे हातांतून सुटण्याविषयीं यत्न करूं लागली. इतका प्रकार खालील लावणींत जोशीबोवानीं मजेदार वर्णिला आहे.

कैसा निपट पटु जाहलासि कान्हयारे ॥ धृ० ॥ पाणियासि जातों आह्मी परयुवती । भर भरली जळो तुझि नव नवती । तुं भरिं भरलासी तुला कोण लवती ॥ चाल ॥ हीं काय खोडरे । जाऊंदे सोडरे । करूं नको वोढरे । शिवायारे ॥ १ ॥ धृ० ॥ आह्मी कोण तुझ्या

आह्मा वाटेमधें आडविसी । नाहक हकजी कशा साठीं वाढविसी । फिर्याद नंदाकडे सांगाया धाडविसी । ॥ चाल ॥ हें काय पापरे देऊ नको तापरे । भला तुझा बापरे । ह्मणायारे ॥ २ ॥ धृ० ॥ संगतीच्या गवळणी गेल्या साऱ्या बायका। जाऊं दे सोड मला यदुकुळनायका । इतुकी हीं गोष्ट माझी आजि तुह्मी आयका ॥ चाल ॥ हा काय न्यायरे । ह्मणो तरी कायरे । आला कवि रायरे । धरायारे ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी ३८.

### शिकवण.

कृष्णत्रासानें एक अनुभवलेली गोपी दुसऱ्या एका तरुण व सासुरवाशी गोपीस शिकवण देऊं लागली कीं, बाई, तूं यमुना तीरावर जाऊं नको. तेथें पाटलांचा मुलगा कान्हा मोठा वाईट खोडकर आहे. तो तुला धरल्याशिवाय राहणार नाहीं. तूं गोरी भुरखी देखणी सासुरवासी पोर तुझ्यावर तो बळजोरी केल्याशिवाय सोडणार नाहीं. याकारितां माझें ऐक. याप्रकारचें कथानक खालील पद्यांत आहे.

बाई नको जाऊं यमुना तिरीं । नंदाचा नंदन हरि करितो बळजोरी, धरिलगे पदरीं । तूं नाजुक रूप सुंदरी । सुभग मंदिरीं । तुझे अंतरीं कळेना परी ॥ धृ० ॥ या वनांत चारित धेनु । वाजवी वेणू । मलाग भुल पडली । हाकमाचा

मुल ह्मण हाटा करील पानघटा धरिच मणग-
टा तो आहे नकली । कोणाचा धाक नाहिं
जरा । मायबाप घरा ह्मणती मुल हरामि या-
चि बुध कळली । काल गौळ्याचि एक नवि
मूल या गावीं दुपारा धरली । बाई उरांत क-
रि धडधडा मारितो चिमखडा होईल भंडव-
डा मात हे उठली । तूं आधींच रूप राजसा,
ह्मणे बहुदिसा मला सांपडली । गवळणीवर
त्याचा सिका तयाच्या हाका वदे त्या फुका
कोण जाऊं सकली ॥ चाल ॥ त्या वनांत जा-
सिल कशी । कांहीं नित नाहीं हाकमा पाशीं ।
तूं तरुणी सासुरवाशी । त्याला पाहुनि बावरी
होशी । तो कपटि कुंज वनवासी ॥ तो बो-
लुनि गोड हलुच वदनिं घर घेउं पाहे कंसा-
री । पोरें मिळउनि करि हा तमाम जाहली
सिमा भुलवली गोकुळ नगरी ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी २९.

### सुंदरी.

एका सुंदर युवतीस पाहून एक रसिकविषयी फार मोहित झाला. आणि मग ही कोणाची कोण, कुठें राहते, आपल्या हातीं कशी लागेल, इत्यादि गोष्टीविषयीं विचार करून तिच्या स्वरूपाचें वर्णन करूं लागला. इतका प्रकार खालील पद्यांत सुरस वर्णिला आहे.

सोन्याचें पायजिव तळीं । मदन पुतळी । टा-

कि भूतळीं मंजु झुमकार । सुंदरि ह्मणसी बा-
हेर चालला हेर । हिचें माहेर कुठें घर दार॥
॥ धृ० ॥ ती उभी मोठी ऐटिनं हार दाटिनं
बोलणं कोटिनं मांडिवर वार । दैवानें घ्या वि
लाभली । नार बांधलि बहुत साधली विरळ
कुण्हिवार ॥ चाल ॥ या परी होउनि बेताल।
त्या तरुणही बहु परिमाळ । पुरविन ह्मणे म-
नाचा ख्याल । लागला विषय हरताळ । शृंगा-
र करुनि अलुमाळ । लागला छंदिं बहुसाल ।
भेटिसि इच्छि आज काल । ठिकाणा सांगा ।
कविराय चमकला हिर लोक चाहिर इतर शा-
हिर काजवें वांगा ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी ४०.

### राधा रमणविलास.

राधेनें हट्ट घेतल्यामुळें श्री कृष्णानें तिची हौस पूर्ण केली. ती अशी कीं, आपण श्रीकृष्ण स्वतः राधा झाले आणि राधेस कृष्ण केले. हुबेहुब असा थाट करून फाल्गुन महिन्याचे एका चांदणें रात्रीं, कृष्ण राधेसहवर्तमान व संपूर्ण गोपींसहित रास रंग खेळले. त्या दिवशीं कृष्ण गोपींच्या खेळाची आणि रति सुखादि संपूर्ण गोष्टींची तेथें अगदीं सीमा होऊन गेली. अशी बहार मग पुनः कधीं व्रजांत झाली नाहीं. तो अपूर्व थाट कविरायानें खालील आपल्या काव्यांत वर्णन केला आहे. जोशीबाबांच्या कवितांशक्तीचा पूर्ण मासला व त्यांच्या कवितेंतील इतर आणखी गुण व रस याची परिपूर्णता ज्यास पाहणें असेल त्यानें ही खालील रसरंगाची लावणी समग्र एकवार तरी लक्ष देऊन वाचावी म्हणजे

आम्हीं ह्मणतो याची सत्यता रसिकांच्या लक्षांत येऊन जोशी बावांचीही खरी योग्यता समजण्यांत येईल. असो. ही लावणी फारच सुंदर बनली आहे.

कुंजामधें संजात मधुप गुंजारव यमुनातटीं।
होरि खेळतो हरी करुनि राधा नट आपण नटी ॥ धृ० ॥ लतागुच्छ सुरतरुही तुच्छपरिस्तुति करिती मधुकरी। विमानवरि दाटल्या उतरल्या गगनि सुरसुंदरी। सूर ताल पकवाज खंजरि मंजरि तबासुरी। बीन अमृत कुंडली कुणी उप सारंगिला धरी। नृत्य कृत्य तत्कार तान करताल झुमक झ्यांजरि। मोरचंग झ्यांजरी पती संपत्यहि नानापरी। रूप रम्य राधेचें राधावल्लभ आपण धरी। तिलोत्तमा उर्वशी मेनका रंभापरि साजिरी। फागामधें बागांत पातला वसंत अंतःपुरीं। कवण राधिकापती कवण राधा हें नकळे खरी ॥ चाल ॥ अग सखेग आनंद मी सांगु किती। अग सखेग एकमेकांवरी टाकिती। अग सखेग कुंकुम अबिर झोंकिती। अग सखेग पिचकाऱ्या मुखिं-मारती। अग सखेग केंशर मृगमद उडविती ॥ चाल पूर्वींची ॥ या रासाचा कोण जाणतां सुरनरवर हातवटी ॥ १ ॥ धृ० ॥ होरि खेळतो ॥ १ ॥ श्रीहरिचें वय रूप राधा धरुनि

कि भूतळीं मंजु झुमकार । सुंदरि ह्मणसी बा-
हेर चालला हेर । हिचें माहेर कुठें घर दार॥
॥ धृ० ॥ ती उभी मोठी ऐटिनं हार दाटिनं
बोलणं कोटिनं मांडिवर वार । दैवानें घ्यावि
लाभली । नार बांधलि बहुत साधली विरळ
कुण्हिवार ॥ चाल ॥ या परी होउनि बेताल।
त्या तरुणही बहु परिमाळ । पुरविन ह्मणे म-
नाचा ख्याल । लागला विषय हरताळ । शृंगा-
र करुनि अलुमाळ । लागला छंदि बहुसाल ।
भेटिसि इच्छि आज काल । ठिकाणा सांगा ।
कविराय चमकला हिर लोक चाहिर इतर शा-
हिर काजवें वांगा ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी ८०.

### राधा रमणविलास.

राधेनें हट्ट घेतल्यामुळें श्री कृष्णानें तिची हौस पूर्ण केली. ती अशी कीं, आपण श्रीकृष्ण स्वतः राधा झाले आणि राधेस कृष्ण केले. हुबेहुब असा थाट करून फाल्गुन महिन्याचे एका चांदणें रात्रीं, कृष्ण राधेसहवर्तमान व संपूर्ण गोपींसहित रास रंग खेळले. त्या दिवशीं कृष्ण गोपींच्या खेळाची आणि रति सुखादि संपूर्ण गोष्टींची तेथें अगदीं सीमा होऊन गेली. अशी बहार मग पुनः कधीं व्रजांत झाली नाहीं. तो अपूर्व थाट कविरायानें खालील आपल्या काव्यांत वर्णन केला आहे. जोशीबावांच्या कवितांशक्तीचा पूर्ण मासला व त्यांच्या कवितेंतील इतर आणखी गुण व रस याची परिपूर्णता ज्यास पाहणें असेल त्यानें ही खालील रसरंगाची लावणी समग्र एकवार तरी लक्ष देऊन वाचावी म्हणजे

आम्हीं ह्मणतो याची सत्यता रसिकांच्या लक्षांत येऊन जोशी बावांचीही खरी योग्यता समजण्यांत येईल. असो. ही लावणी फारच सुंदर बनली आहे.

कुंजामधें संजात मधुप गुंजारव यमुनातटीं। होरि खेळतो हरी करुनि राधा नट आपण नटीं ॥ धृ० ॥ लतागुच्छ सुरतरुही तुच्छपरिस्तुति करिती मधुकरी। विमानवरि दाटल्या उतरल्या गगनिं सुरसुंदरी। सूर ताल पकवाज खंजरि मंजरि तबासुरी। बीन अमृत कुंडली कुणी उप सारंगिला धरी। नृत्य कृत्य तत्कार तान करताल झुमक झ्यांजरि। मोरचंग झ्यांजरी पती संपत्यहि नानापरी। रूप रम्य राधेचें राधावल्लभ आपण धरी। तिलोत्तमा उर्वशी मेनका रंभापरि साजिरी। फागामधें बागांत पातला वसंत अंतःपुरीं। कवण राधिकापती कवण राधा हें नकळे खरी ॥ चाल ॥ अग सखेग आनंद मी सांगुं किती। अग सखेग एकमेकांवरी टाकिती। अग सखेग कुंकुम अबिर झोंकिती। अग सखेग पिचकाऱ्या मुखिं मारती। अग सखेग केशर मृगमद उडविती ॥ चाल पूर्वीची ॥ या रासाचा कोण जाणतां सुरनरवर हातवटी ॥ १ ॥ धृ० ॥ होरि खेळतो ॥ १ ॥ श्रीहरिचें वय रूप राधा धरुनि

राधानट नागर धणी । पीतवसन बासुरी मुगु-
ट शिरीं तिळभर नाहिं उणी । हा भाव नृ-
त्यांत नटाकृति भावि दावी त्याक्षणीं ।
मदनमूर्ति सांवळी तनु सुकुमार फार दे-
खणी । तथै तथै ततथै तननो तननन
वेणूकणी । नृत्य गीत माधुरी हरीची आपण
कालीय फणी । गर्व रहित गंधर्व सर्व त्या
वसंत संतर्पणीं । कंठीं घालिति मिठी ह्मणती
राधेला यदुकुळमणी । रास जगज्जनकास
मुखामधें हास हिऱ्याची खणी । बुलाख नथ
कशिकी चमक जशी शुक्राची चांदणी ॥चाल॥
अग सखेग रासामधें यदुनायका । अग सखेग
नच वळखिती किति बायका । अग सखेग
धरूं मुरलीच्या नायका । अग सखेग सो-
डिति नयनें सायका । अग सखेग कुणी
ह्मणती हरि आयका । हें मोठें कीं नवल
राधिका धरि नरवर कुचतटीं ॥ २ ॥ धृ० ॥
होरि खेळतो ॥ वसंतऋतु संतान कुंजते तरूवर
फुल्ले फुलीं । किति फिरती गोपिका कितिक
रंगामधें भिजल्या मुली । शुक पिकबक कोकि-
ळा काम पक्षामधें पडल्या भुली । मयूर वर
नाचति दिली गति कन्हयानें आपुली । कुंद
मंद मकरंद धुंद पिचुमंद बकुल बनखुली । गुलाब

मधु मालती मोगरा बटचंपक मखमली । मंद-
शीत अतिसुगंध पवनासहित कुसुम लाखुली ।
किति रासमंडळीं गुलालही लालललित पाडली ।
स्त्रीवेशें हरी होरि खेळतो नवल काय गो-
कुळीं । अनंत कौतुक करी धरी अवतार कृ-
ष्ण माउली ॥ चाल ॥ अग सखेग रासांत धूम
मातली । अग सखेग श्रीरंगमूर्ति पातली । अ-
ग सखेग रंगांत तळीं घातली । अग सखेग गो-
पिका सकळ रातली । अग सखेग ठाउक न
किलि आंतली ॥ सत्य सत्य हे माया रुसली
कशी येईल शेवटीं ॥ ३ ॥ धृ० ॥ होरी खेळ-
तो हरी करुनि नट राधा आपण नटी ॥ ३॥
पुरुषवेषें राधा निजवेषें कंवटाळुनि चुंबिती ।
हरि ह्मणुनि गोपिका शुद्ध राधेला आलिंगिती
। अंग संग रति भंग दंग रंगामधिं किति ला-
जती । मनीं ह्मणाति कामिनी नव्हे हे माधव
सुख संगती । अष्ट नायका कृष्ण ह्मणुनि रा-
धेला कंवटाळिती । काय सांगुं मी विचित्र हो-
री मजला तरी भासती । सार साक्षी संसार-
सार कौंसारि धरूं धांवती । कुणि व्यजन चा-
मरें धरिती पिचकाऱ्या मारिती । ज्या रासाम-
धें गुलाब केशरी मृगमद नदि वाहती । अशी
धूम मातली कळेना कोण गोपिकापती ॥ चाल ॥

अग सखेग धांवत आलें मी तुजकडे । अग सखेग सांगाया दुःख रोकडें । अग सखेग आधींच तुझें वांकडें । अग सखेग हें मोठें मज सांकडें । कपटरूपिणी राधा येउनि धरिल तुझी हनुवटी ॥ ४ ॥ धृ० ॥ होरी ॥ रासामधें हरिलागिं समजलें भामा रुसली पिशी । निजरूपातें धरि करी खटपट पट पिंवळा कसीं । रंगांतुनि सदनांत एकटा हरि पोंचे तिजपशी । संचित पशुचे रीति तशी मंचावरी ते मुसमुसी । हळूच पदतळें चुरुनि तिचे मांडिस देतसे उशी । उठुनि ह्मणे भामिनी सवती मजपुढें सोंग मिरविसी । त्या कपट्याचें रूप धरुनि किति रांडेला ठकविसी । तसें मजही पाहसी कळेना सयेवो मज चवकशी । ऐकुनि हरि ह्मणे भोग जाहला गोष्ट करावी कशी । हात जोडुनि तिला ह्मणे मी कृष्ण विष्णुच्या कुशीं ॥चाल॥ अग सखेग नको संशय धरूं फारसा । अग सखेग घे क्षणभरि शांतिच्या रसा । अग सखेग करिं कंकण नको आरसा । अग सखेग मग मुख चुंबी सारसा । अग सखेग भामा मुख पडे गारसा । कविरायानें यापरि नेली रासामधें गोरटी ॥ ५ ॥ धृ० ॥

## लावणी ४१.

### आडविणें.

ही लावणी फार मजेदार आहे. यांत चार भाषा आहेत. संस्कृत, कानडी, हिंदुस्थानी आणि महाराष्ट्र इतक्या भाषेत या लावणीची रचना आहे. गोपी दहिंदूध घेऊन मथुरेस जात असतां कृष्णानें त्यांला वाटेंत अडविलें आहे. त्यामुळें गोपी रागास येऊन कृष्णाशीं बोलत आहेत व जाऊं देण्याविषयीं साम, दाम, दंड, भेद करून विनंति करीत आहेत.

पाही पाही निजभवनं प्रति का बोलसी मुडदारा। नितं मातना केळुदिला चल छोड पल्लो मेरा ॥ धृ० ॥ देहि देहि पथमिदं मुरारे उचित नव्हे तुजला । मी परगतिणी याक पकडता यौं क्यौं करभुला । पाहि पाहि निज जनकयशस्त्वं सोडीं वाट मजला । नवपति निजमणी मुणग दशा क्यौं किने तुज बोला ॥ चाल ॥ त्वं कया विनोदं कुरुषे वेडे मूल । निवतं दिगेहळे क्यौं तुज पडली भूल । त्वद्दर्शनतः खलु उठतो मस्तक शूळ। इगनाडि माधव नाशिरपंर डाळुंगी धुळ ॥ चाल ॥ मुंच मुंच चैलांचलमधुना नंदाच्या पोरा ॥ हिडनियतं गिगमन्याग पिहूजन बुरा बहूत मेरा ॥ १ ॥धृ०॥ तिष्ठ तिष्ठ सखि इतकी कागे रागानें बोली । नागोकुळपति निन्नम्याल खुषी सुनरी अलवेली । अंग-संगमो मया समं तव दैवदशा खु-

लली। इष्टम्याल बिन मनसा गौलन मान भरनवाली ॥ चाल ॥ यन्मयोदितं तत्सत्यं निजमनीं मान । नडि कुजद् वको भैनै जुज बेमान। किंत्वोषं कुरुते मागतसे तुज दान । निमिति याड कसि देख हमारी शाम । त्वं तु रतिमिह मयोचिता नको भाव धरूं दुसरा । इष्ट मात मन केला सखे क्यौं उतर गये चेहरा। ॥ २ ॥ धृ० ॥ सापि गोपिका यदुपतिवचनादतिमुदिता गोरी । हरि कई हिडि कसि नडिके लिगमे तुयपर हुंवाली ॥ शांत भवतु ते कांत वदनचुबंनामिह घे पदरीं । सिडव्याड इगद्या माडि तुम परवर गिरधारी ॥ चाल ॥ इति तद्वचसा किल हर्षित हरि धरि हात। आ गोपिक चुंबक कोट्टा गुजर गई रात । सालब्धरता मग आप हरिला गात। यलो नागेश वल्ली सुनो बेहेरि कीबात ॥ धुंडि शाहिर शरणं नको करूं लटिका तोरा । व्यंकट पति व्यंकटपति मुंदड फुगळू हिडि तव गावनका छोरा ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी ४२.

### प्रार्थना.

खालील लावणी सर्व संस्कृतांत आहे. परंतु तिची मजा अशी कांहीं आहे कीं, लावणी वाचतांच अथवा ह्मणतांच ती सं-

स्कृत न समजणाऱ्या मनुष्यासही सर्व समजते, व अर्थ ध्यानांत येऊन मनास फार आनंद होतो. यांतील प्रास संस्कृत आहेत परंतु कानास फार गोड लागतात. ही लावणी अर्धीच म्हणजे हिचा एकच चौक सांपडला आहे. यांतील अर्थ असा आहे कीं, एक तरुण पुरुष एका तरुण सुंदरीचे स्वरूपास मोहित होऊन तिणें वश व्हावें म्हणून तिची स्तुतीसहित प्रार्थना करीत आहे.

तरुणि तवेदं कुचतटमति गुरु कुरु मम हृदि
सादरं । मनो मे वहति मनोभवदरं ॥ धृ० ॥
अधर मधुर मधूरस रसिकं मामुज्जीवय तावकं ।
प्रिये मे शमय विरह-पावकं ॥ मुंचति मदनः
स्वीकृतकदनो मयि विषमं सावकं । निवारय
तं सखि रति नायकं ॥ कोपादरुणं कुरु म-
यि करणं रुचि निर्जित धावकं । दगंतं पाहि
निजं सेवकं ॥ जहि जहि मानं मा भज मौनं
अनुकुरुषे किं बकं । त्वदीयं लपितं सुखयति
न कं ॥चाल॥ त्वं मुधा भजसि मयि रुषं कि-
मिति कातरे । किं कृतं मया वद भामिनी रु-
चिराधरे । कुरु कृपामरुणरुचि पल्लव कोम-
लकरे । साहसं किमिदमति कोप भरे मधुरे ।
मंजुल तर मृदु सिंजित मणिमय मंजिर द्युति-
धरं । नतोहं तावकपदपुष्करं ॥ १ ॥ धृ० ॥

## लावणी ४३.

ही लावणी साधी व फार जुने चालीवर म्हणावयाची आहे. यांत एका आधकानें एका सुंदर स्त्रीचें वर्णन करून तो दुस-

न्यास म्हणजे आपल्या स्नेह्याजवळ तिची स्तुति करीत आहे अ-
सा भाग दाखविला आहे. यांत प्रास व यमकें साधण्याची खुप
रेलचेल उडवून दिली आहे. लावणी खुबीदार आहे.

सरु पदरिंचें पातळ जरिचें राव कसिद्याची
मुस ओतली । कुचतटि बळकट कंचुकि चापट
ओढि माझे मनिंही फार रुतली । चटपट अ-
णवट जोडव्याची झटपट दाहि बोटिं मेंदी रंग-
ली । वदन रदन रंगित मदन तिचे रति स-
ख्या जगू बुंद खुलली । कोंवळ्या ओंठाचा रंग-
पोंवळ्यास लाविनंग अंग संग खुप बनली ।
जडिताचे बाजुबंद कानि कुसुमाचे गेंद मंद मं-
द गति चालली । सिंह कटिसम कटि रुपा-
चि हौस मोठी कुणाचे पोटीं जन्मली । नय-
नाचे मारी बाण सख्या गेला होता प्राण अ-
वचट मीनें हे उद्धवली ॥पाहुनि भुल पडली॥
माझे हृदयांत जडली । बहु झटक्यानें नटली ।
जशी हवयीं सुटली । तसी माझे दिठीं पडली।
पटपट तिची गती पाहुनि मी झटपट गति
विसरलों उदमाची । तटतट उरावरी लटपट
हार करी जसी काय पुतळी कनकाची ॥१॥
धृ० ॥ नार नवी तरुणी काय सांगु रमणी ज-
शी नागिण देवा घरची ॥ पाहुनि स-
ख्या मी भुललों रमलों अघटित करणी

ब्रह्मयाची ॥ धृ० ॥ १ ॥ पिंवळ चमक नवि धमक आंगामधीं भांग टिळ्याची खुबि भारी । त्याजवरी बिजवर रुचिर बहु उभी सख्या उजरित गोरी । राखडि जडित वरि हिऱ्याची टिकलि दावि ठकडि आकड[३] कडि मुद् भारी । टकटक तिचि मजकडेचि लागतां जणु बरचि हृदयीं मारी । अधरिं मधूरस सुधेपरिस रस पाहुनि लाजवी करि हारी । जाहली लगबग चालली बघून मग मी तर भुललों दिशा चारी । धडड धडड धड धडके उर मग सुदबुद माझी गेलि सारी । लागलि मनांत गोडी कधिं न हिला मी सोडी । पाहूं चल सख्या गुलजारी ॥ चाल ॥ अरे सख्या नव्हे सुंदरी । मदनाची तरवारी । घुसली कट्यार उरीं । जलदि उपाय करीं । चल तरि तिचें मंदिरीं । तन मन धन तिजविण मज उपवन पवन भवन जाची । गहन दहन झालि सहन करूं मी किती करि सख्या गति याची ॥ २ ॥ धृ ॥ सजण ह्मणेरे तुझें वजन बहुत आतां त्यज न हिया सखया । घडिभर थिर धर गडबड नको तुझी तुज आणिन तुझे ठाया । वदुन तयाचा गडि साधून बरवि घडी गेला तिस रिझवाया । देऊन उदंड धन मोहवूनि ति-

चें मन नेलि नार रमवाया। पाहूनि तियेस मग झाला गडि डगमग तगमग सुटली तया। शयना वरुनि मृगनयना नेलि मग मनोरथ पुरवाया। अशी रमविली नार पावला सुखाचा पार गार झालि त्याचि काया। चालली तिथून नित दोघाचि संगत मग जडलि बहूत माया॥ चाल॥ वंदूनि गुरुराया। केला कविनें छंद गाया। नागेशा भुलवाया। त्याचि कलगी उडवाया। व्यंकटपति विनवाया। शाहिर धोंडिनें केलि पाही लावणी अशी बाहार कुणा कविची। घडेल तरी मी कच्चा घड्यानें वाहिन पाणी वाहिली शपथ साची॥ ३॥ धृ०॥

## लावणी ४४.

### विरहातुर तरुणी.

या लावणींत प्रास यमकें वगैरे जोशीबुवांची नेहमीं हातोटी उत्तम साधली असोन शिवाय विप्रलंब शृंगाररस चांगला साधला आहे. एक तरुण सुंदरी आपल्या प्रिय पतीच्या भेटीस अगदीं आतुर झाली असून विरहानें वेडी होऊन आपल्या स्थितीचें व त्यावेळच्या समयाचें वर्णन करीत आहे. हा भाग कवीनें खालील लावणींत साधिला आहे.

झाली तरुणपणाची धूळ। पति नाहीं सेजेवरि सुंदरा रडे मुळमूळ॥ धृ०॥ हा वसंत ऋतु अनिवार। करि मदन शरांचा मार बहुत बेजार।

आतां काय करूं मी संसार । सर्पापरि गमती गडे गळ्यामधें हार । जासुद कराति वेरझार । नाहिं पत्र साजणीं कथितें तपसिलवार । या विरह समुद्रापार । कधिं होईन बाई येति कधिं सरदार ॥ चाल ॥ काय करूं मंचकीं बसून । नाहिं सर्व सौख्य मज असून । बोलूं कुणा सर्व मी हसून । अंतरला साजण आला बाई मजला दिसून । मीं चित्त पाहिलें बहुत तयाचें कसून । ओढवलें दैव आतां काय तया वरि रुसून ॥ चाल ॥ बाई सर्व सुखाचें मूळ । तो दिलभर मजला होईल कधि अनकूळ ॥ १ ॥ धृ० ॥ सजणाविण झालें दीन । जसा तप्त वाळूमधें तळमळतो मीन । काय सांगूं संचित हीन । नाहिं सये वर्तमान वर्षें झालीं तीन । बाई झालें दुःखाधीन । आतां देह तयाचे चरणावर ठेवीन कधिं नेत्र भरून पाहीन । हा विलास त्या विण मजला देतो शीण ॥चाल॥ नार पतिविण कसि वरि दिसल । परपुरुष घरामधिं घुसल । मग स्वकीय जन हा हसल । हा शुद्ध भाव जरि माझे मनिचा असल । तरि सजण सखे मज लौकर नयनिं दिसल । ना तरि तो परनारिसी गुंतून फसल ॥ चाल ॥ एवढ्यावर नकळे खूळ ॥ पिंगळा

सकाळीं शुभ वदला पांगूळ ॥ २ ॥ धृ० ॥
अशि नार पडली शोकांत । मग तिचा सखीनें कवळून धरिला हात । ह्मणे काय करिशी घात । जाईल सखे तुज आज सुखाची रात । हा ध्वनि पडतां कानांत । उघडिलें नेत्र तों जासुद उभा द्वारांत । घाबरली पुसे हुजरांत । कुण्हिकुन आली हो काय सुखाची मात ॥ ॥ चाल ॥ स्वारि अलि बयाजी कडक । बागांत उतरले भडक । हे ऐकुनि झालि रंग सडक । हर्षानें भेटली सजणाला बेधडक । हरि संकट हरि नाग्यास बैसली धडक । टाकून दे कलगी व्यंकटपतिला हुडक । लिंब खासिल टाकूनि गूळ । धोंडि शाहिर कविचा छंद उरावर शूळ ॥ ३ ॥ धृ० ॥

## लावणी ४९.

### संवाद.

खालील लावणी मोठी पांच चवकांची असून त्यांत चमत्कारिक रीतीनें दोघां आषक माषुकांचा संवाद जोशीबुवांनीं वर्णन केला आहे.

नको दुरुन जाऊं मजवरून पाहेगे फिरून । गडे बोल मजसीं तुझे जिवासाठीं मी झालों परदेशी ॥ धृ० ॥ ही रीत भल्याचि नव्हे नीत पडशिल जीत उगिच कां सजणी । सांग उमजून

मजला धरूं नको तूं गुळणी । हें जिणं तुझ्या विण सुनं कशास वाचणं ग वोंगळवाणी । तूं न पाहसी तरि खचित पडेन मी धरणीं । अशी छळूं नकोगे दूर पळूं शेवटिं तुज कळूं येइलगे गडणी । किति विनंत्या करितों नुमजसि अं-तःकरणीं । अग सडी बोल तरी घडी मनाचि काढ अढी नको पळूं वहिनी । यांत नाहिं भ-लेपण उमज मनिं कांहीं सजणी ॥ चाल ॥ कामिनी तुझे नयनानें । गेलों मरून नाहिं अ-वसानें । पाहि फिरून देग जिवदानें । डोळे भरून गेले पाण्यानें । सखे जुलूम केला मद-नानें । आज जखम लागली झालों अखम ह-जारांचि रकम बुडाली जैशी । तसा खेद वा-टतो मनीं कसा जीव घेसी ॥ १ ॥ धृ० ॥ वेडसरा उगाच जाय घरां हाकम नाहिं बरा कशाला फिरशी । या गोष्टित नाहिं बरें जि-वाला मुकसी । बेहाय बोलसी तरी काय माणूस तरि पाह्य उगिच भरि भरसी । जळो तूझि आ-कल ही कुणी शिकविली तुजशी । मी नार प-रावि तरवार कठिण आहें फार कशासाठीं बुडसी । चाल दुर होय वेड्या अशा गुणानें काय घेसी । आडदांडपणानें जरि हात लाविशी तरी घात होइल कां मरसी । कसा देखत डो-

ळा जाऊन आडामधें पडसी ॥ चाल ॥ अरे पडसि अशानें पेचीं । जेंव्हां हुकम ओढितिल कमची । तेंव्हां आठवल नार तुज कैंची । जाय निघून होशिल बेखरची । खोड जरब माझ्या घरच्यांची । काय गरत गांवांत नाहीं फिरत कुणाचि काय जुरत पुसायासाठीं । काय नांव करिसी हें येउन भल्याचे पोटीं ॥ २ ॥ धृ० ॥ राहें उगी आहे समज जोगी नांवाचि तूं सगी ठाऊक मज नारी । कां उडविशी मालूम तुझ्या गुणाची थोरी । बोल सुधी एकांतिं कधीं रमविशी अधीं सांग कीं स्वारी । ज़्वानिमधें घडेना तर कधीं विषय सुंदरी । जिव गेला तरि हा जाऊं मुख तुझें पाहूं मग ना राहूं कबुल या नगरीं । घर बुडविन आपुलें आलों भल्याचे उदरीं । कुणी धरिल त्याचा आहे धणी करिन सोडवणी मोडिनगे पदरीं । तुजसाठीं उभा राहिन जाउन मी सदरीं । तुजविना माझिया मना कांहीं करमेना पदर मी पसरीं । नारि ऐकूनही वासना करूं नको दुसरी ॥ चा. ॥ अगे दुसरी गोष्ट मज कांहीं । तुज वांचून रुचत नाहीं । कांहीं इलाज कर या देहीं । अगे नयन तुझे दिन रयन पाहुनि मसीं चैन पडेना कसी । वाचवी हा माझा प्राण येईल

कामासी ॥ ३ ॥ धृ० ॥ निघ इथून राहे वरि जथून अशानें कसि मथून येइल तुझे हातीं । मी निर्मळ मनिंचीं आहें सुरतेचें मोती । सोड वाट होइल बोभाट उगिच कारे हाट करिसी मज वरती । आहे जवळ चावडी येइल जिवावर पुरती । बेहाय बोलसी काय माणसें बघती । जाइ निघून उगिच हें बघुन येइल कुणि मागुन धराया जपती । घरदार विकुन मग करावि लागेल भरती । घरिं बाइल असुनि जसि बइल फिरसी बरें होइल कशानें पुढती । लंकेचा रावण पाहि सिते सांगाती ॥ चाल ॥ सांगातिण करसिल मातें । काय बुडसिल आपुल्या हातें । काय बोलसी उडवुन नातें । असें कळविन जरि घरच्यातें । भय सुटल तुझ्या बापातें । तुज कसा अजुन भरवसा आहेस कसा पिसा लागसिल पाठीं । मी बरि नव्हें तुज होईन विषाची वाटी॥ ४॥ धृ० ॥ असें दुष्ट वचन तिचें स्पष्ट ऐकुनी कष्ट वाटले त्याला । ह्मणे काय करूं मी जिव हा निघुनी गेला । देह भान उडालें मदनानं गळालं अवसान बहुत घाबरला । तेंव्हां लगबग जाऊन सजण सखीनें धरला । ह्मणे उठा धरून मनगटा इषक रंग लुटा तुह्माला दिधला । मी कठि-

ळा जाऊन आडामधें पडसी ॥ चाल ॥ अरे पडसि अशानें पेचीं । जेंव्हां हकम ओढिति-ल कमची । तेंव्हां आठवल नार तुज कैंची । जाय निघून होशिल बेखरची । खोड जरब माझ्या घरच्यांची । काय गरत गांवांत नाहीं फिरत कुणाचि काय जुरत पुसायासाठीं । काय नांव करिसी हें येउन भल्याचे पोटीं ॥ २ ॥ धृ० ॥ राहें उगी आहे समज जोगी नांवाचि तूं सगी ठाऊक मज नारी । कां उडविशी मालूम तुझ्या गुणाची थोरी । बोल सुधी एकांति कधीं रम-विशी अधीं सांग कीं स्वारी । ज्वानिमधें घडे-ना तर कधीं विषय सुंदरी । जिव गेला तरि हा जाऊं मुख तुझें पाहूं मग ना राहूं कबुल या नगरीं । घर बुडविन आपुलें आलों भल्याचे उदरीं । कुणी धरिल त्याचा आहे धणी क-रिन सोडवणी मोडिनगे पदरीं । तुजसाठीं उ-भा राहिन जाउन मी सदरीं । तुजाविना मा-झिया मना कांहीं करमेना पदर मी पसरीं । नारि ऐकूनही वासना करूं नको दुसरी ॥ चा. ॥ अगे दुसरी गोष्ट मज कांहीं । तुज वांचून रु-चत नाहीं । कांहीं इलाज कर या देहीं । अगे नयन तुझे दिन रयन पाहुनि मर्सी चैन पडेना कसी । वाचवी हा माझा प्राण येईल

कामासी ॥ ३ ॥ धृ० ॥ निघ इथून राहे व-
रि जथून अशानें कसि मथून येइल तुझे हा-
तीं । मी निर्मळ मनिंचीं आहें सुरतेचें मोती ।
सोड वाट होइल बोभाट उगिच कारे हाट
करिसी मज वरती । आहे जवळ चावडी ये-
इल जिवावर पुरती । बेहाय बोलसी काय
माणसें बघती । जाइ निघून उगिच हें बघुन
येइल कुणि मागुन धराया जपती । घरदार
विकुन मग करावि लागेल भरती । घरिं बाइल
असुनि जसि बइल फिरसी बरें होइल कशानें
पुढती । लंकेचा रावण पाहि सिते सांगाती ॥
चाल ॥ सांगातिण करसिल मातें । काय बुड-
सिल आपुल्या हातें । काय बोलसी उडवुन
नातें । असें कळविन जरि घरच्यातें । भय सु-
टल तुझ्या बापातें । तुज कसा अजुन भरवसा
आहेस कसा पिसा लागसिल पाठीं । मी बरि
नव्हें तुज होईन विषाची वाटी॥ ४॥ धृ० ॥ अ-
सें दुष्ट वचन तिचें स्पष्ट ऐकुनी कष्ट वाटले
त्याला । ह्मणे काय करूं मी जिव हा निघुनी
गेला । देह भान उडालें मदनानं गळालं अ-
वसान बहुत घाबरला । तेंव्हां लगबग जाऊन
सजण सर्वांनें धरला । ह्मणे उठा धरुन मन-
गटा इषक रंग लुटा तुह्माला दिधला । मी कठि-

ळा जाऊन आडामधें पडसी ॥ चाल ॥ अरे पडसि अशानें पेचीं । जेंव्हां हकम ओढितिल कमची । तेंव्हां आठवल नार तुज कैंची । जाय निघून होशिल बेखरची । खोड जरब माझ्या घरच्यांची । काय गरत गांवांत नाहीं फिरत कुणाचि काय जुरत पुसायासाठीं । काय नांव करिसी हें येउन भल्याचे पोटीं ॥ २ ॥ धृ० ॥ राहें उगी आहे समज जोगी नांवाचि तूं सगी ठाऊक मज नारी । कां उडविशी मालूम तुझ्या गुणाची थोरी । बोल सुधी एकांतिं कधीं रमविशी अधीं सांग कीं स्वारी । ज़्वानिमधें घडेना तर कधीं विषय सुंदरी । जिव गेला तरि हा जाऊं मुख तुझें पाहूं मग ना राहूं कबुल या नगरीं । घर बुडविन आपुलें आलों भल्याचे उदरीं । कुणी धरिल त्याचा आहे धणी करिन सोडवणी मोंडिनगे पदरीं । तुजसाठीं उभा राहिन जाउन मी सदरीं । तुजाविना माझिया मना कांहीं करमेना पदर मी पसरीं । नारि ऐकूनही वासना करूं नको दुसरी॥चा.॥ अगे दुसरी गोष्ट मज कांहीं । तुज वांचून रुचत नाहीं । कांहीं इलाज कर या देहीं । अगे नयन तुझे दिन रयन पाहुनि मसीं चैन पडेना कसी । वाचवी हा माझा प्राण येईल

कामासी ॥ ३ ॥ धृ० ॥ निघ इथून राहे घ-
रि जथून अशानें कसि मथून येइल तुझे हा-
तीं । मी निर्मळ मनिचीं आहें सुरतेचें मोती ।
सोड वाट होइल बोभाट उगिच कारे हाट
करिसी मज वरती । आहे जवळ चावडी ये-
इल जिवावर पुरती । बेहाय बोलसी काय
माणसें बघती । जाइ निघून उगिच हें बघुन
येइल कुणि मागुन धराया जपती । घरदार
विकुन मग करावि लागेल भरती । घरिं बाइल
असुनि जसि बइल फिरसी बरें होइल कशानें
पुढती । लंकेचा रावण पाहि सिते सांगाती ॥
चाल ॥ सांगातिण करसिल मातें । काय बुड-
सिल आपुल्या हातें । काय बोलसी उडवुन
नातें । असें कळविन जरि घरच्यातें । भय सु-
टल तुझ्या बापातें । तुज कसा अजुन भरवसा
आहेस कसा पिसा लागसिल पाठीं । मी बरि
नव्हें तुज होईन विषाची वाटी॥ ४ ॥ धृ० ॥ अ-
सें दुष्ट वचन तिचें स्पष्ट ऐकुनी कष्ट वाटले
त्याला । ह्मणे काय करूं मी जिव हा निघुनी
गेला । देह भान उडालें मदनानं गळालं अ-
वसान बहुत घाबरला । तेंव्हां लगबग जाऊन
सजण सखीनें धरला । ह्मणे उठा धरुन मन-
गटा इषक रंग लुटा तुह्माला दिधला । मी कठि-

ण बोललें मन तुमचें पाह्याला । मग सजण धरुनि मानिं मगन चमकले गगन वरासी नेला । सांगावें कुठवर असा तिणें रमविला ॥ चाल ॥ रमविला तसा आनंदीं । जन बहुत कविनें या छंदीं । काय गातील नागेश नंदी । शिवदासीन आमुची वादी । तिचें गायन सुर बे बंदी ॥ चाल ॥ धोंडी शाहिर ह्मणे मी आहे जाहिर नागेशा वैर करूं नको मजशीं । व्यंकटपति बांधुन नेईल तुला शिवदासी ॥ ५ ॥ धृ० ॥

समाप्त.